


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९५ ■ मंगळवार, दि. ५ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८


RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# 85 प्रश्न कॉपी-पेस्ट?

**दौंड SRPF भरतीचा सावळा गोंधळ ▸▸फडणवीस सरकारच्या पारदर्शकतेचे निघाले वाभाडे!**

प्रतिनिधी ५ मे

**पुणे/मुंबई :** महाराष्ट्रातील तरुणांच्या भविष्याशी खेळण्याचा धडाका या सरकारने अद्याप थांबवलेला नाही, असाच काहीसा संताप आता पोलीस भरती प्रक्रियेवरून व्यक्त होत आहे. 'राज्य राखीव पोलीस दला'च्या दौंड गट ५ च्या लेखी परीक्षेत जे घडलं, ते पाहता ही परीक्षा होती की एखाद्या खासगी क्लासची 'ओपन बुक टेस्ट', असा जळजळीत सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारला आहे.



नुकत्याच पार पडलेल्या एस आर पी एफ च्या परीक्षेत १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न एका खासगी क्लासच्या टेलिग्राम चॅनेलवर देण्यात आलेल्या नमुना प्रश्नपत्रिकेतून आणि पुस्तकातून 'जसेच्या तसे' आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एकाच प्रकाशनाच्या पुस्तकातून इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रश्न येणे हा निव्वळ योगायोग नसून, यात मोठी 'साखळी' सक्रिय असल्याचा संशय बळावला आहे. आता चेंडू राज्य सरकारच्या कोर्टात आहे. जर वेळीच चौकशी झाली नाही, तर 'पारदर्शक भरती' हा शब्द केवळ सरकारी जाहिरातींपुरताच मर्यादित राहील, अशी भीती व्यक्त होत आहे.

### ८५ प्रश्नांचा 'चमत्कार' घडलाच कसा?

खासदार सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांना साकडं घालत म्हटलंय की, 'एखाद्या क्लासचे १-२ प्रश्न येणं समजू शकतं, पण ८५ प्रश्न येणं हा कोणता चमत्कार आहे? मुलं आयुष्याची अनमोल वर्षं मेहनत करतात, पण अशा प्रकारांमुळे परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतं. याची सखोल चौकशी झालीच पाहिजे!'

### 'पारदर्शकतेचा विनोद झाला'

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी तर सरकारला धारेवर धरले आहे. त्यांनी सरकारवर प्रहार करताना म्हटले 'तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी प्रश्नपत्रिका काढणं अपेक्षित असताना खासगी प्रकाशनाचं पुस्तक वापरलं जातं, ही व्यवस्था ढासळल्याची निशाणी आहे. ही चूक नाही, तर तरुणांच्या स्वप्नांचा केलेला खून आहे. ३९७७ मुलांनी प्रामाणिकपणे मेहनत घेतली, त्यांच्या आयुष्याशी खेळण्याचा अधिकार सरकारला कुणी दिला? महाराष्ट्रात गेल्या काही काळापासून स्पर्धा परीक्षांचा खेळखंडोबा सुरू आहे. कधी पेपर फुटी, तर कधी प्रश्नांची पुनरावृत्ती. पोलीस भरतीसारख्या संवेदनशील प्रक्रियेतही जर खासगी क्लासचे हित जपले जात असेल, तर सर्वसामान्य घरातील मुलांनी मेहनत करायची कशासाठी? असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

### शासनाकडून उत्तराची अपेक्षा:

प्रश्नपत्रिका काढणाऱ्या समितीचा आणि 'त्या' खासगी क्लासचा काय संबंध? इतक्या मोठ्या प्रमाणात प्रश्नांची पुनरावृत्ती झाली असताना ही परीक्षा रद्द होणार का? दोषींवर कठोर कारवाई करून सरकार विद्यार्थ्यांचा विश्वास परत मिळवणार का?

# पाकिस्तानपासून अमेरिकेपर्यंत भाजपच्या विजयाचा डंका!



प्रतिनिधी ५ मे

**नवी दिल्ली :** भारताच्या राजकीय नकाशावर एक मोठा बदल घडवत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. या निकालांचे पडसाद केवळ भारतातच नव्हे, तर जगभरातील प्रतिष्ठित वृत्तपत्रांमध्येही उमटले आहेत. पाकिस्तानपासून अमेरिकेपर्यंतच्या वृत्तपत्रांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विजयाची दखल घेतली आहे.

पंतप्रधान मोदींनी गेल्या १५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेसच्या सत्तेला सुरुंग लावला आहे. त्यामुळे भाजपला प्रथमच बंगालमध्ये सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. पश्चिम बंगालसोबतच आसाममध्ये भाजपने आपली सत्ता राखली असून, पुद्दुचेरीमध्ये एनडीएचे सरकार स्थापन होणार आहे. राज्यातील पश्चिम बंगालसह आसाम, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरी या पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांचे निकाल नुकतंच जाहीर झाले. या निवडणुकांचे सर्वात मोठे आकर्षण पश्चिम बंगाल होते. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या या राज्यात भाजपने जोरदार मुसंडी मारली आहे. विशेषतः ममता बॅनर्जींचे एकेकाळचे सहकारी आणि आताचे भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील आक्रमक प्रचारामुळे तृणमूल काँग्रेसला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे.

**पाकिस्तान (डॉन वृत्तपत्र) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांच्या ताब्यात असलेल्या पश्चिम बंगालमध्ये विक्रमी विजय मिळवला आहे. हिंदू राष्ट्रवादी पक्षाने मिळवलेला हा विजय मोदींच्या राजकीय ताकदीची साक्ष देतो, असे डॉन या वृत्तपत्रात म्हटले आहे.

**ब्रिटन (बीबीसी न्यूज) :** भाजपने भारतातील सर्वात कठीण राजकीय सीमांपैकी एक असलेल्या बंगालवर विजय मिळवला आहे. हिंदी भाषिक पट्ट्यात वर्चस्व गाजवल्यानंतर आता भाजपने ईशान्य आणि पश्चिम बंगालसारख्या प्रादेशिक आव्हानांनाही यशस्वीपणे मोडीत काढले आहे, अशा शब्दात बीबीसीने या विजयाचे वर्णन केले आहे.

**अमेरिका (न्यूयॉर्क टाइम्स वृत्तपत्र) :** न्यूयॉर्क टाइम्सने या निकालाला इतिहासाची पुनर्रचना म्हटले आहे. १० कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यात भाजपने मिळवलेला हा विजय मोदींच्या सर्वात मोठ्या टीकाकारांपैकी एक असलेल्या ममता बॅनर्जींच्या १५ वर्षांच्या सत्तेचा अंत करणारा आहे, असे अमेरिकेच्या न्यूयॉर्क टाईम्समध्ये म्हटले आहे.

बांगलादेश (ढाका ट्रिब्यून वृत्तपत्र) : स्वातंत्र्यानंतर बंगालमध्ये भाजप आपले पहिले सरकार स्थापन करून इतिहास रचणार आहे.

# अंगावर जखमांचे व्रण, पोस्टमार्टम रिपोर्टमधील शॉकिंग माहिती

प्रतिनिधी ५ मे

**पुणे :** पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका साडेतीन वर्षांच्या मुलीवर एका नराधमाने अत्याचार करुन तिला निर्घृणपणे संपवल्याची घटना १ मे रोजी घडली होती. या घटनेनंतर राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. लहान मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला तात्काळ फाशी द्यावी, या मागणीसाठी नसरापूरचे ग्रामस्थ आक्रमक आहेत. अशातच या चिमुरड्या मुलीचा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. या अहवालातील माहिती अंगावर अक्षरशः काटा आणणारी आहे. तर या घटनेतील चिमुरड्या मुलीचा मृत्यू कशामुळे झाला त्याची माहिती देखील समोर आली आहे. नसरापूर घटनेतील पीडित मुलीचा मृत्यू 'ॲस्फिक्सिया' मुळे झाल्याचे समोर आले आहे. ही माहिती पोस्टमॉर्टम रिपोर्ट मधून माहिती समोर आली आहे.

चिमुरडीचा श्वास कोंडला

ॲस्फिक्सिया म्हणजे श्वास कोंडणे, याच कारणामुळे चिमुरडीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. नराधमाने चिमुरडीच्या तोंडात मोजा कोंबल्यामुळे चिमुरडीचा श्वास कोंडला गेला आणि त्यात तिचा जीव गेला. तसेच पीडित चिमुरडीच्या अंगावर जखमा आल्या आढळून आल्याची माहिती पोस्टमॉर्टम रिपोर्ट मधून माहिती समोर आली आहे. जेव्हा आपल्याला श्वास घेता येत नाही किंवा शरीरात ऑक्सिजन कमी पडतो, तेव्हा त्या अवस्थेला ॲस्फिक्सिया म्हणतात. पोस्टमार्टम रिपोर्टमधून समोर आलेल्या माहितीवरुन नराधमाने या मुलीवर अत्याचार केल्यानंतर तिला किती निर्घृणपणे मारले होते, हे दिसून येत आहे. ही मुलगी आपल्या पालकांसह पुण्यात राहत होती. ती उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आपल्या आजोळी नसरापूर येथे गेली होती.

# पश्चिम विदर्भात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** हवामान विभागाने ५ आणि ६ मे रोजी अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम या जिल्ह्यांसाठी हवामानाचा नवीन अंदाज जाहीर केला आहे. या दोन दिवसांत काही जिल्ह्यांत मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर काही ठिकाणी ढगाळ हवामान राहणार आहे.ष्मंगळवार आणि बुधवार तुरळक पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. अकोल्यात वादळी वाऱ्यासह पाऊस राहील. त्याच बरोबर अंशतः ढगाळ वातावरणाने तापमान नियंत्रणात राहील. अमरावती जिल्ह्यात काही ठिकाणी आकाश ढगाळ राहील. वादळी वाऱ्यासह पाऊस त्याच बरोबर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज वेध शाळेने वर्तवला आहे.

# नवऱ्याची किंमत 1 लाख!
## चंद्रपुरात पत्नीकडून पतीची सुपारी

प्रतिनिधी ५ मे

**चंद्रपूर :** पत्नीने एक लाख रुपयांची सुपारी देत शिक्षक पतीची हत्या केल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. ही घटना भद्रावती तालुक्यातील घोडपेठ येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी पत्नीसह चार आरोपींना अटक केली आहे. रवींद्र तुळशिराम कुळमेथे (४६) रा. गडचिरोली असे मृतकाचे नाव आहे. तर पत्नी दीपमाला कुळमेथे, वर्षा परचाके, सोनू उर्फ प्रवीण कालोकर आणि नाझीर अंसारी असे आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृताची ओळख पटवली. प्राथमिक तपासात हा आकस्मिक मृत्यू वाटत असला तरी सखोल चौकशीत धक्कादायक सत्य समोर आले. मृतकाची पत्नी दीपमाला कुळमेथे हिनेच पतीच्या खुनासाठी वर्षा परचाके, सोनू उर्फ प्रवीण कालोकर आणि नाझीर अंसारी यांना १ लाख रुपयांची सुपारी दिल्याचे निष्पन्न झाले. भद्रावती पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेने संयुक्त कारवाई करत आरोपी दीपमाला कुळमेथे व वर्षा परचाके यांना वरोरा येथून, तर सोनू उर्फ प्रवीण कालोकर व नाझीर अंसारी यांना नागपूर येथून अटक केली. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली कार व तीन मोबाइल जप्त करण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. १ मे रोजी आरोपींनी मृतकाला कारमध्ये बसवून घोडपेठ येथील सुनसान ठिकाणी नेले. तेथे कारमध्येच त्याचा गळा आवळून खून करण्यात आला आणि मृतदेह घटनास्थळी टाकून आरोपी पसार झाले. रवींद्र हा गडचिरोली येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक होता. मात्र मागील दीड वर्षांपासून तो शाळेत जात नव्हता. त्याला दारूचे व्यसन होते व त्यातच तो पत्नीला मारझोड करीत त्रास देत असल्याचे पत्नीने सांगितले.

# भाजपाकडून केवळ निवडणुका जिंकण्यासाठी पैसा अन् सत्तेचा वापर!
## खा. संजय राऊत यांचा भाजपवर हल्लाबोल

प्रतिनिधी ५ मे

**मुंबई :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या जात आहेत. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी या निकालावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षावर कडाडून टीका केली आहे. भाजप केवळ निवडणुका जिंकण्यासाठी सत्तेचा आणि पैशाचा गैरवापर करत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी मुंबईत माध्यमांशी बोलताना केला. संजय राऊत म्हणाले की, भाजप ३६५ दिवस केवळ निवडणुका कशा जिंकायच्या याच सराव करत असतो. देशाचे गृहमंत्री २०-२० दिवस बंगालमध्ये राहतात. येथे सत्तेचा आणि पैशाचा वारेमाप वापर केला जातो. खऱ्या अर्थाने याला लोकशाहीतील निवडणूक म्हणता येणार नाही. विरोधी पक्षाने निवडणुकाच लढवू नयेत, अशी भाजपची धारणा आहे. पुढे संजय राऊतांनी, ज्या प्रकारे पाकिस्तान आणि रशियामध्ये निवडणुका होतात, जिथे निकालाची घोषणा एक दिवस आधीच झालेली असते, तशाच प्रकारच्या निवडणुका आता भारतात होऊ लागल्या आहेत, असा टोला त्यांनी लगावला. पंतप्रधानांनी महिला मतदारांच्या पाठिंब्याबाबत केलेल्या विधानावर राऊत यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले, पंतप्रधानांनी बोलताना भान ठेवून बोलावे. महिला विधेयक कधीच मंजूर झाले आहे, पण त्याची अंमलबजावणी कुठे आहे? जर महिलांच्या पाठिंब्यामुळे तुम्ही जिंकत असाल, तर केरळमध्ये सर्वाधिक महिला साक्षर आहेत, तिथे तुम्हाला अपयश का आले? केरळमध्ये भाजपला का स्वीकारले गेले नाही? असा सवाल त्यांनी केला.

### हा लोकशाहीचा नव्हे 'मोदी-शहांचा विजय'

शेअर मार्केट आणि रुपयाच्या घसरणीवरूनही त्यांनी केंद्र सरकारला धारेवर धरले. राऊत यांच्या मते, भाजपची सत्ता आल्यावर रुपया आणि शेअर मार्केट सुद्धा कोसळले आहे. हा लोकशाहीचा विजय नसून मोदी-शहांचा विजय आहे. अनेक मतदारांची नावे मतदार यादीतून कापली गेली आहेत. हा निकाल म्हणजे देशात मोदींच्या पतनाची सुरुवात आहे.

# ममता बॅनर्जी यांना 'दुहेरी' धक्का!
## सत्ता तर गेलीच, पण हक्काच्या मतदारसंघातून आमदारकीही हुकली

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या निकालात सर्वात मोठा राजकीय भूकंप झाला आहे. खुद्द मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना आपल्या हक्काच्या भवानीपूर मतदारसंघात पराभवाचा धक्का बसला आहे. गेल्या १५ वर्षांपासून बंगालवर सत्ता गाजवणाऱ्या दीदींना मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आहे. भाजपचे उमेदवार शुभेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांचा १५,११४ मतांनी पराभव केला आहे. एकेकाळच्या आपल्याच विश्वासू सहकाऱ्याने दीदींचा बालेकिल्ला उद्ध्वस्त केला आहे. या पराभवामुळे तृणमूल काँग्रेसच्या गोटात मोठी शांतता पसरली आहे.

दिवसभर या मतदारसंघामध्ये आघाडी पिछाडीचा खेळ सुरु होता. पण आता या मतदारसंघाचा संपूर्ण निकाल हाती आला आहे. त्यामुळे पश्चिम बंगालच्या राजकारणातील सर्वात प्रतिष्ठेच्या भवानीपूर मतदारसंघात अखेर भाजपने बाजी मारली आहे. २० व्या आणि शेवटच्या फेरीची मतमोजणी पूर्ण झाली असून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला आहे. एकेकाळी ममतांचे अत्यंत विश्वासू सहकारी असलेल्या शुभेंदू अधिकारी यांनी सलग दुसऱ्यांदा त्यांना थेट लढतीत पराभूत करून आपले राजकीय वर्चस्व सिद्ध केले

### भाजपचा ममतादीदींवर निशाणा

दरम्यान, बंगालमधील महाविजयानंतर पंतप्रधान मोदींनी दिल्लीतील पक्षाच्या कार्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केले आहे, त्यानंतर आता भाजपने सोशल मीडियावर 'खेला शेष' म्हणजेच खेळ संपला अशी पोस्ट केली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 'खेला होबे' (खेळ सुरु झाला आहे) असे म्हटले होते. त्याला आज भाजपने उत्तर दिले आहे. दरम्यान भाजप बंगालमध्ये २०५ जागांवर आघाडीवर आहे.

# मंत्री अतुल सावेंच्या ओएसडीवर गुन्हा

प्रतिनिधी ५ मे


**पुणे :** भाजपचे नेते आणि मंत्री अतुल सावे यांचे विशेष कर्तव्य अधिकारी यांच्या विरोधात पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय धुलचंद कारंडे असं सावेंच्या ओसडींचं नाव आहे, त्यांच्यावर पत्नीचा खून करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत कारंडे यांनी आपल्या लहान मुलालाही बॅटने बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० एप्रिल रोजी नवीन गार्डन या त्यांच्या निवासस्थानी ही घटना घडली असल्याचं समोर आलं आहे.

क्वीन्स गार्डन निवासस्थानी पत्नीने कारंडे यांच्या मोबाईलमधील काही चॅटबाबत विचारणा केली आणि मोबाईलचा पासवर्ड मागितला.

# जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून केरळमध्ये धडकेल!
## भारतीय हवामान विभागाने वर्तवला अंदाज

प्रतिनिधी ५ मे

**मुंबई :** सध्या महाराष्ट्रात उन्हाचा कडाका वाढला आहे. या कडाक्याच्या उन्हाने हैराण झालेल्या नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार, यंदा नैऋत्य मोसमी वारे अर्थात मान्सून वेळेवर दाखल होणार आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून केरळच्या किनारपट्टीवर धडकेल, असा अंदाज आहे. त्यानंतर त्याची



वाटचाल महाराष्ट्राच्या दिशेने सुरू होईल.

सामान्यतः मान्सून १ जूनच्या सुमारास केरळमध्ये दाखल होतो. हवामान विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, यंदाही ही स्थिती कायम पाहायला मिळत आहे. यंदा मान्सूनची प्रगती समाधानकारक आहे. संपूर्ण देशाचा विचार करता, यंदा सरासरीच्या तुलनेत पाऊस थोडा कमी म्हणजेच ९२ ते ९५ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तरी मान्सूनचे वेळेवर आगमन शेतीसाठी आणि पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. पॅसिफिक महासागरातील अल निनो स्थितीचा मान्सूनवर काहीसा परिणाम होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. सध्या मे महिन्याच्या सुरुवातीला राज्याच्या काही भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. मात्र तरी मान्सूनची मुख्य वाटचाल अरबी समुद्रातील वाऱ्यांच्या वेगावर अवलंबून असेल. हवामान विभागाने मान्सून वेळेवर येईल.

### विदर्भात मान्सूनचे आगमन २० जूनच्या आसपास?

केरळमध्ये मान्सून दाखल झाल्यानंतर साधारणपणे ८ ते १० दिवसांत मान्सून महाराष्ट्रात प्रवेश करतो. त्यामुळे यंदा १० ते १२ जूनच्या दरम्यान कोकण किनारपट्टी आणि मुंबईत मान्सूनचे आगमन होण्याची शक्यता आहे. तसेच पुणे आणि मध्य महाराष्ट्रात १५ जूनपर्यंत मान्सून राज्याच्या अंतर्गत भागात पोहोचू शकतो. विदर्भ आणि मराठवाड्यात जूनच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत म्हणजे २० जूनच्या आसपास मान्सून दाखल होईल. यानंतर मान्सून संपूर्ण महाराष्ट्र व्यापेल, असा अंदाज आहे.

# निवडणूक संपताच सैन्याकडून बंगालच्या उपसागरात 'नोटीस टू एअरमेन' जारी

**नवी दिल्ली :** भारताने बंगालच्या उपसागरात एक मोठा 'नोटीस टू एअरमेन' जारी केला असून, सुमारे ३,५५० किलोमीटरचा परिसर 'डेंजर झोन' म्हणून घोषित केला आहे. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत आपली शक्तीशाली इंटरमीडिएट रेंज बॅलिस्टिक मिसाइल 'अग्नी-४' च्या चाचणीची तयारी करत आहे. या चाचणीसाठी निवडण्यात आलेली वेळ अतिशय महत्त्वाची मानली जात असून, हा एक मोठा आंतरराष्ट्रीय संदेश असल्याचे बोलले जात आहे. ही चाचणी २५ एप्रिल २०२६ ते ६ मे २०२६ या



कालावधीत होऊ शकते. विशेष म्हणजे, मे २०२५ मध्ये भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत मोठे हल्ले केले होते. या धाडसी कारवाईला एक वर्ष पूर्ण होत असतानाच भारत ही क्षेपणास्त्र चाचणी करत आहे. ६ मे रोजीच ही चाचणी होण्याची शक्यता आहे. भारत केवळ अग्नी-४ नव्हे, तर ८०० किमी पल्ल्याच्या ब्रह्मोस क्रूझ मिसाइल आणि हायपरसोनिक क्षेपणास्त्रांवरही काम करत आहे.

CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

मंगळवार, दि.५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मिल्खा सिंग एक आदर्श व्यक्तिमत्व

जेव्हा आम्ही लहान होतो त्यावेळेस घरातील मोठी माणसे मिल्खासिंग यांच्या बद्दल आम्हाला माहिती सांगत की, कसे ते ऑलम्पिक ॲथलेट मध्ये भारताला मेडल मिळून देण्यासाठी थोड्या सेकंदामुळे नाबाद झाले होते. हे ऐकून वाईट पण वाटायचे, पण प्रेरणाही मिळायची. प्रेरणा यामुळे की त्यांनी एवढ्या मोठ्या पातळीवर देशाला फक्त प्रदर्शितच केले नाहीतर गौरव पण हे मिळून दिलेला आहे. बऱ्याच जणांना त्यांच्या जीवनामधून प्रेरणा घेण्यासारखे नक्कीच काहीतरी मिळालेले आहे. मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९३१ रोजी पंजाबमधील गोविंदपुरा येथे झाला होता. जे की वर्तमान काळात पाकिस्तान मध्ये येते. त्यांचे खूप भाऊ-बहीण होते. त्यांच्यातील आठ हे भारताच्या विभाजन पूर्वी जगाला सोडून गेले होते.

भारत आणि पाकिस्तान यांच्या विभाजनामध्ये ते अनाथ झाले होते, कारण यादरम्यान त्यांच्या आई-वडिलांची हत्या करण्यात आली होती. मिल्खा सिंगने हे घडताना स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले होते आणि पुढे येणारे काही वर्ष मिल्खा सिंगला याच गोष्टीचा त्रासही झाला.पंजाबमध्ये सतत चालणाऱ्या हिंसेमुळे मिल्खा सिंग १९४७ ला दिल्लीला आले आणि काही दिवस ते त्यांच्या बहिणीजवळ राहिले. यादरम्यान त्यांना बीना तिकिटाचा रेल्वेचा प्रवास केल्यामुळे तुरुंगातही जावे लागले होते. त्यांच्या सुटकेसाठी त्यांच्या बहिणीला स्वतःची काही दागिनेही विकावे लागले होते. या व्यतिरिक्त ते काही दिवस पुराना किल्ला, रिफ्यूजी कॅम्पमध्ये राहिले होते.

मिल्खा सिंग हे जीवनाला खूप कंटाळून गेले होते. त्यामुळे त्यांनी डकैत बनण्याचाही निर्णय घेतला होता, परंतु त्यांच्या भावाने त्यांना समजून सांगितले व भावाच्या सांगण्यावरून त्यांनी इंडियन आर्मी जॉईन करण्याचा निर्णय घेतला. आपल्या चौथ्या भरतीत त्यांनी सफलतापूर्वक आर्मीची भरती काढली. सन १९५१ मध्ये ते पहिल्या वेळेस सिकंदराबाद येथे धावपटू (ॲथलीटिक) मध्ये उतरले.

यापूर्वी त्यांना ऑलिंपिक व ॲथलीट याबद्दल काहीच माहित नव्हते. त्यांच्या जोरदार रनिंगमुळे आर्मीने त्यांना धावपटूची ट्रेनिंग देण्यासाठी निवडले आणि तेथूनच त्यांचे 'द फ्लाईंग सिंग' बनण्याचे प्रयत्न चालू झाले. त्या काळात धावपटूसाठी नव्हे तर कोणत्याच खेळासाठी सुविधा उपलब्ध नव्हत्या. परंतु मिल्खा सिंग यांनी स्वतःच्या हिमतीने खूप मेहनत केली आणि १९५६ मध्ये झालेल्या मेलबॉर्न ऑलम्पिकमध्ये भारताकडून धावले. परंतु अनुभव कमी असल्यामुळे ते सुरुवातीच्या स्तरावरती ही पोहोचले नाहीत. त्यावेळी शर्यतीत त्यांनी २०० मीटर व ४०० मीटर सामन्यात भाग घेतला होता. त्यावेळेस त्यांची मुलाखत ही चार्ल जेनगेस यांच्यासोबत झाली. जे की ४०० मीटर शर्यतीचे विजेता होते. त्यांनी मिल्खा सिंगला फक्त प्रेरितच केले नाही तर ट्रेनिंग साठी काही टिप्स पण दिल्या आणि त्या टिप्सला त्यांनी खूप मेहनतीने करायला चालू केले. मेलबर्न ऑलिम्पिक नंतर ठीक दोन वर्षानंतर म्हणजे १९५८ ला सगळीकडे मिल्खा सिंगचे नाव गाजत होते. त्यांनी २०० मीटर व ४०० मीटर रेस मध्ये नॅशनल गेम ऑफ इंडियामध्ये रेकॉर्ड बनवले होते. त्यानंतर एशियन गेम मध्ये ही गोल्ड मेडल मिळवले होते.



मिल्खा सिंग यांच्या यशाचा प्रवास पुढे चालूच राहिला व त्यांनी नंतर ब्रिटिश अंपायर आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये गोल्ड मेडल मिळवले या यशानंतर ते भारताचे पहिले ॲथलेट बनले होते की, ज्यांनी कॉमनवेल्थ गेम्स मध्ये ही गोल्ड मेडल मिळवले होते त्यांचे हे रेकॉर्ड खूप महत्त्वाचे होते. त्यावेळेसचे प्राईम मिनिस्टर जवाहरलाल नेहरू यांनी मिल्खा सिंग सोबत मीटिंग केली व त्यांना म्हटले की, तुम्ही पाकिस्तानच्या फाळणीला विसरून जा, व १९६० च्या ऑलिंपिक वरती लक्ष केंद्रित करा आणि मिल्खा सिंगनेही तसेच केले. ते गोल्ड मेडल मिळवण्याच्या खूप जवळ आले होते पण मिळवण्यात ते असफल राहिले. ज्या शर्यतीत ते धावले होते त्यामध्ये टॉप चार मध्ये ते आले होते आणि त्या चारही जणांनी ऑलम्पिकचे जुने रेकॉर्ड तोडले होते.

कदाचित दुसरा कोणता दिवस असता तर मिल्खा सिंगने हे मेडल मिळवलेही असते पण हे त्यांच्या नशिबातच नव्हते. या आठवणींना पण मिल्का सिंग यांनी खूप वाईट म्हटले आहे. त्यानंतर त्यांच्या रनिंगमध्ये कसलाच कमीपणा आला नाही. व एकानंतर एक मेडल ते मिळवत राहिले. पण एका गोष्टीची खंत वाटत होती की जर एखादे ऑलम्पिक मेडल असते तर किती छान झाले असते. जरीही त्यांना या गोष्टीची कमी वाटत असेल पण आपल्याला कधीच या गोष्टीची गरज भागणार नाही. कारण मिल्खा सिंग यांनी भारतासाठी एक दोन नाही तर खूप मेडल जिंकलेले आहेत .त्यामध्ये एशियन गेम व कॉमनवेल्थ गेम मध्ये मिळणारे मेडलही सामील आहे. त्यांच्या कामगिरीबद्दल त्यांना १९५९ मध्ये पद्मश्री हा पुरस्कारही दिला गेला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज आपण यावरूनही लावू शकतो की- जेव्हा त्यांना २००१ मध्ये भारत सरकारने अर्जुन अवॉर्ड देण्याचे बोलले होते त्यावेळेस त्यांनी या पुरस्काराला नकार दिला होता व म्हटले होते की, हा पुरस्कार तरुण खेळाडू मुलांसाठी आहे माझ्यासाठी नाही. आज त्यांचे सर्व मेडल पटियालामधील म्युझियम मध्ये ठेवलेले आहेत. एवढेच नाही तर रोममध्ये त्यांनी जे बूट घातले होते, ते लोकांना पाहण्यासाठी म्युझियम मध्ये ठेवण्यात आले आहेत.

तसंच त्यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल सांगायचं झालं तर १९६२ मध्ये त्यांनी निर्मल कोर यांच्यासोबत विवाह केला होता व त्यांचा एक मुलगा ही आहे त्याचं नाव जीव मिलखा सिंग हे आहे. ते पण एक सर्वांना माहीत असलेले गोल्फर आहेत. कौर सोबत मिल्खा सिंगचे वचन कदाचित आयुष्यभराचेच होते.त्यामुळे निर्मल कोर या जगाला सोडून गेल्यानंतर काही दिवसांनीच मिल्खा सिंगही आपल्या सर्वांना सोडून गेले. त्यांचा मृत्यू १८ जून २०२१ मध्ये कोविड-१९ मुळे झाला होता.भलेही आज ते आपल्यामध्ये नाहीत पण त्यांची कामगिरी व जीवन परिचय हा आपल्याला खूप प्रेरित करतो.

## डिजिटल शेतीकडे वाटचाल !

# महाॲग्री धोरणामुळे शेतकऱ्यांना मिळणार नवीन तंत्रसुविधा



***मुंबई : 'महाराष्ट्र कृषी- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९' या धोरणास मंगळवारी मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दर्शविला असून, या निर्णयामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टिक्षमता, रोबोटिक्स आणि पूर्वानुमान विश्लेषण यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मदतीने शाश्वत व विस्तारयोग्य उपाययोजना राबविता येणार आहेत.***

### शेतकऱ्यांसाठी उपक्रम

कृषी विस्तार सेवा अधिक प्रभावी व शेतकरी-केंद्रित बनवण्यासाठी विस्तार उपक्रम राबवण्यात येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून जनरेटिव्ह आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा उपयोग / करून शेतकऱ्यांना मराठीतून वैयक्तिक सल्ला दिला जाईल. या उपक्रमांतर्गत मराठीत कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित चॅटबॉट्स, व्हॉईस असिस्टंट्स यांची मदत घेतली जाईल. त्याद्वारे पीक उत्पादन, रोग-कीड व्यवस्थापन, हवामान अंदाज, बाजारभाव व योजनांची माहिती देण्यात येईल.

या धोरणामुळे राज्यातील ॲग्रिस्टेक, महा-ॲग्रिस्टेक, महावेध, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डीबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी त्रिस्तरीय प्रशासकीय रचना असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या तीन वर्षांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्र वेगाने बदलणारे आहे. त्यामुळे पुढील पाच वर्षांत या धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यात येतील. त्यासाठी राज्यस्तरीय सुकाणू समिती, राज्यस्तरीय तांत्रिक समिती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ॲग्रिटेक नावीन्यता केंद्र, कृषी विद्यापीठांतर्गत कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नावीन्यता केंद्र काम करतील.

### कृषी विद्यापीठांमध्ये केंद्र

आयआयटी/आयआयएससीसारख्या संस्थांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इनक्युबेशन केंद्र स्थापण्यात येतील. त्याशिवाय डेटा-आधारित शेती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरासाठी उपयोगी ठरतील अशा डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा उभारल्या जातील. या सुविधा राज्यव्यापी, सुरक्षित, सुसंगत व संमती-आधारित डेटा देवाण-घेवाण सुलभ करतील. क्लाऊड आधारित कृषी डेटा एक्स्चेंज आणि सँडबॉक्सिंग सुविधा उपलब्ध केली जाईल, या डिजिटल प्लॅटफॉर्मशी केंद्र व राज्य सरकारचे शेती संबंधीत सर्व डेटाबेस जोडण्यात येतील.

### जिओ टॅगिंगचा वापर

अन्नसुरक्षा, पुरवठा साखळीतील पारदर्शकता, अन्न गुणवत्ता हमी आणि शेतमालाला जागतिक बाजारपेठ मिळावी यासाठी कृत्रिम बुद्धिमता, ब्लॉकचेन आणि क्यू-कोड तंत्रज्ञानावर आधारित राज्यव्यापी शोधक्षमता व गुणवत्ता प्रमाणीकरण प्लॅटफॉर्म उभारण्यात येईल. प्लॅटफॉर्मद्वारे शेतापासून ग्राहकापर्यंतच्या प्रवासात पिकांना दिलेली खते व औषधे, शेती पद्धती, कापणीपश्चात प्रक्रिया व गुणवत्ता प्रमाणपत्र बाबींचे डिजिटल आणि जिओ-टॅग केलेली नोंदवही तयार करेल.

### 'एनआरआय'ना दिलासा

राज्यातील खासगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना अनिवासी भारतीयांच्या मुलांना व पाल्यांना प्रवेश मिळावा, याकरिता प्रवेश व शुल्क विनियमन अधिनियम, २०१५ मधील व्याख्येत सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

### ट्रायबल क्लस्टरला जमीन

ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील मौजे जांबुटके (ता. दिंडोरी) येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन देण्यास मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना उद्योग उभारण्याकरिता भूखंड उपलब्ध होणार आहे.

### मदत कक्ष उभारणार

नवीन धोरणानुसार, राज्य कृषी विद्यापीठे, तांत्रिक संस्था आणि संशोधन भागीदारांमध्ये एआय एमएल व कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाईल. कृषी विभागातील अधिकाऱ्यांसाठी विशेष कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण टूलकिट तयार करण्यात येतील. शेतकरी आणि शेतकरी उत्पादक संस्थांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता वापराबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण, डिजिटल साधने आणि मदत कक्ष उपलब्ध करून दिले जातील. संस्था व उद्योग क्षेत्रासोबत भागीदारी करून प्रशिक्षणाचे दर्जा व उपयुक्तता वाढवली जाईल.

# महिलांसाठी असलेले बेस्ट सेक्टर !

बहुतेक स्त्रिया नोकरीची निवड करताना नोकरीचे स्थान आणि वातावरण या गोष्टींसह कामाचे प्रोफाइल आणि पगार यासारख्या गोष्टींवर विशेष लक्ष देतात. टिचिंग, एविएशन जॉब, फॅशन डिझायनर, एचआर अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिला करिअर करण्यास प्राधान्य देतात. या सेक्टर्समध्ये चांगला पगार मिळतो तसेच कामाचे तास आणि वातावरण देखील चांगले मिळते.

महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करताना दिसतात. जरी महिला प्रत्येक क्षेत्रात नोकऱ्या करू शकतात पण अनेक सेक्टर्स महिलांना कामासाठी बेस्ट मानली जातात. ज्यामध्ये काही क्षेत्रे महिलांसाठी खूपच सोयीस्कर असतात. अशा सेक्टर्समध्ये करिअर करण्यास अनेक महिला प्राधान्य देतात. आरामदायी नोकरी, चांगला पगार आणि चांगले वातावरण असणारी अनेक सेक्टर्स आहेत. बहुतेक स्त्रिया नोकरीची निवड करताना नोकरीचे स्थान आणि वातावरण या गोष्टींसह कामाचे प्रोफाइल आणि पगार यासारख्या गोष्टींवर विशेष लक्ष देतात.

### विमान वाहतूक नोकऱ्या

महिलांसाठी एविएशन क्षेत्रही खूप चांगले असल्याचे सांगितले जाते. हे क्षेत्र ग्लॅमरस करिअरचा पर्याय मानला जातो. तुमचे संवाद कौशल्य चांगले असेल, तुम्ही आकर्षक दिसत असाल, तर तुम्ही या क्षेत्रात सहज करिअर करू शकता, त्याचबरोबर पगारही खूप चांगला आहे. या क्षेत्रात फिरण्याची संधी मिळेल. तसेच तुम्ही परदेशातही प्रवास करू शकता. अनेक विमान वाहतूक कंपन्या आणि भारतीय विमान कंपन्या महिलांची भरती करतात.

### शिकवणीच्या नोकऱ्या



महिलांसाठी शिकवण्याच्या नोकऱ्या सर्वोत्तम मानल्या जातात. या क्षेत्रात काम करण्यासाठी वेळ नेमका असतो. नोकरीनंतर तुम्ही स्वतःसाठी बराच वेळ काढू शकता. शिक्षण क्षेत्रातील वाढही लक्षणीय आहे. पगाराच्या बाबतीतही हे क्षेत्र खूप चांगले आहे आणि जास्त वेळ द्यावा लागत नाही. तथापि, शिकवण्याच्या नोकऱ्यांचा पगारही तुमच्या पात्रतेवर अवलंबून असतो. चांगल्या आणि खासगी शाळांमध्ये पगार पुरेसा आहे. खासगी शिकवणीतूनही चांगली कमाई करता येते.

### फॅशन डिझायनर नोकऱ्या

फॅशन आणि लाइफस्टाइल दिवसेंदिवस अधिक प्रगत होत आहे. आजची तरुणाईही फॅशनबाबत खूप दक्ष आहे. फॅशन क्षेत्रातही भविष्यात खूप वाढ होणार आहे. अशा परिस्थितीत करिअरसाठी फॅशन डिझायनिंग जॉब हा एक चांगला पर्याय आहे. महिलांनाही हे क्षेत्र खूप आवडते असते. तुम्हाला फॅशन डिझायनिंगमध्ये आवड असेल तर तुम्ही या क्षेत्रात करिअर करू शकता. यासाठी तुम्हाला कोणत्याही चांगल्या ठिकाणाहून डिप्लोमा किंवा पदवी घ्यावी लागेल.अनुभव आणि क्षमतेनुसार पदवी मिळेल.

### एचआर नोकऱ्या


एचआर मॅनेजमेंट हा महिलांसाठी करिअरचा उत्तम पर्याय आहे. तुम्हाला कॉर्पोरेट क्षेत्रात काम करण्याची इच्छा असेल तर एचआर नोकऱ्या चांगला पर्याय आहे. करिअरच्या चांगल्या सुरुवातीसाठी तुम्ही एचआर मॅनेजमेंटमध्ये एमबीए किंवा पीजीडीएम कोर्स करू शकता. एचआरचे काम प्रत्येक कंपनीत केले जाते. या क्षेत्रातील वाढ खूप चांगली करिअर ग्रोथ आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# बालकवी म्हणजे मराठी भाषेला पडलेले रम्य स्वप्न !



आज स्मृतिदिन

## दिन विशेष

बालकवी म्हणजे बालपण ..! मराठी भाषेला पडलेलं एक सुंदर, रम्य, मनोहर स्वप्न ..! उत्फुल्ल प्रसन्न निसर्गच..! आमच्या लहानपणी शाळांमधील शिक्षक बालकवींच्या कविता मुलांकडून सामूहिकपणे म्हणवून घेत असत तेव्हा सर्वांनाच खूप जोर चढत असे. त्यामुळे त्यावेळी पाठांतरही सहज होत असे. मराठी कविता कुठलीही असली तरी कविता रचणारे कवी... त्यांची कविता व शिकवणारे शिक्षक घरचेच वाटायचे... नकळतपणे एक आपुलकीचा नैसर्गिक भावबंधनाचा हा त्रिवेणी संगम अगदी सहजरित्या शाळेत तयार व्हायचा...

'श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे, क्षणात येती सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे' ही निसर्ग कविता तर सर्वांच्या मनामध्ये कायमचे घर करून राहिली आहे. कारण या कवितेची चाल, लय, ठेका व योग्यस्थळी जोर लावून ती सामूहिकपणे म्हणवून घेण्याची गुरुजींची पद्धत सारंच अद्भुत होतं. त्र्यंबक बापूजी ठोंबरे अर्थात बालकवी यांनी लिहिलेली ही कविता मराठी साहित्याच्या इतिहासात अजरामर झाली आहे. बालकवींचा जन्मसुद्धा श्रावणातल्या ऑगस्ट महिन्यातच व्हावा, हासुद्धा एक दैवयोगच म्हणावा लागेल. बालकवींचा जन्म १३ ऑगस्ट १८८९ रोजी जळगाव जिल्ह्यातील धरणगाव या निसर्गसंपन्न गावात झाला. नैसर्गिक फुलोरा असलेलं हे सुंदर गाव, अवतीभवतीचा परिसर बालकवी लहानपणापासूनच बघत होते. निसर्गाविषयीचे आकर्षण इथेच त्यांच्या मनामध्ये रुजले. धरणगावातील दत्त टेकडी म्हणजे बालकवींचे आवडते ठिकाण. तासनतास येथे बसून बालकवी कविताविश्वात रमून जायचे. वडिलांच्या नोकरीमुळे एरंडोल,यावल,जामनेर, बेटावद अशा ठिकाणी बालकवींचे बालपण व्यतीत झाले. मात्र, चौथ्या वर्गात जाईपर्यंत बालकवींचा कवितांशी फारसा संबंध आला नाही. चौथ्या वर्गात त्यांनी श्रीधर महिपती यांच्या कवितांचे प्रथम वाचन केले. मुकटी येथे असताना त्यांनी बालवक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतला व मोरोपंतांच्या कवितेवर भाष्य करून बक्षीसही. पण ते स्वीकारले नाही. पुढे निबंधमाला वाचन, इंग्रजीचे अध्ययन, संस्कृतमध्ये असलेल्या पुस्तकातला गोडवा, दासबोधाचा अभ्यास, असा प्रवास करीत बालकवींनी 'वनमुकुंद' ही पहिली कविता नवापूर येथे गाऊन सादर केली. याच काळात बालकवींची प्रतिभा खऱ्या अर्थाने फुलायला लागली होती. वयाच्या सोळाव्या वर्षी बालकवींनी रामचंद्र कृष्ण वैद्य यांच्यासोबत काश्मीर, मथुरा, आग्रा इत्यादी स्थानांचा प्रवास केला. यानंतर एरंडोलमधून प्रकाशित होणाऱ्या 'दशकाल वर्तमान' या साप्ताहिकामध्ये 'मुलांस उपदेश' ही बालकवींची कविता पहिल्यांदा छापून आली आणि इथूनच त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचा 'बालकवी'कडे प्रवास सुरू झाला.

जळगाव येथे 'काव्यरत्नावली' या मासिकाचे संपादक नाना फडणीस उर्फ नारायण नरसिंह फडणीस यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रातील पहिले कविसंमेलन जळगाव येथे झाले. या कविसंमेलनात वी. मो. महाजनी, चंद्रशेखर, माधवानुज, तर्खडकर, ना. वा. टिळक असे दिग्गज उपस्थित होते. या संमेलनात केवळ सतराव्या वर्षी बालकवींनी स्वरचित कविता हजारो श्रोत्यांपुढे सादर केली. या कवितेने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. संमेलनाध्यक्ष कर्नल का. र. कीर्तीकर यांनाही बालकवींच्या प्रतिभेने स्तीमित केले आणि त्यांनी उत्स्फूर्तपणे 'वा बालकवी वा...' अशी दाद दिली. नाना फडणवीस यांनी त्याच ठिकाणी त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांना 'बालकवी' ही पदवी जाहीर केली व कर्नल कीर्तीकर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान केला. तेव्हापासून त्र्यंबक बापूजी ठोंबरे हे 'बालकवी' म्हणून परिचित झाले. याच काव्यगंगेतून सर्वांना आनंद देणारी 'फुलराणी' अवतीर्ण झाली. महाराष्ट्राच्या कितीतरी पिढ्या या फुलराणीने फुलवल्या. कला आणि जीवनाचा उत्कट संगम असलेले बालकवींचे फुलराणी म्हणजे बालकवींचे अमर काव्य पुष्पच!

बालकवींना केवळ अठ्ठावीस वर्षांचे आयुष्य लाभले. ऐन तारुण्यात पैशाची चणचण होती. त्यातच पत्नी पार्वतीबाई यांचीही जबाबदारी होती. ओढाताणीमुळे त्यांच्या कुटुंबातील वातावरण काहीसे क्लेशकारक झाले होते. त्यातच रेव्हरंड टिळक यांचे आनंददायी घर कधीच सुटले होते. अशा विमनस्क अवस्थेत 'रमाई' या मातृतुल्य अध्यात्मिक विभूतीला भेटण्यासाठी घरून बोलावणे आले. जळगाव येथील घरी जाण्याकरिता भादली स्टेशनवर पोहोचले. आकाशाकडे बघत असताना ते कवितेच्या विश्वात रममाण झाले. रेल्वे स्टेशनजवळ रूळ ओलांडत असताना त्यांची चप्पल रुळाच्या तारेत अडकली व ते खाली पडले. तितक्यात दुसऱ्या बाजूने एक मालगाडी धडधड करत आली व त्यांच्या अंगावरून वेगाने निघून गेली. अशा रीतीने एका महान बालकवींचा तारुण्यातच करुण अंत झाला, तो दिवस होता ५ मे १९१८. बालकवींचा मृत्यू अवघ्या महाराष्ट्राला चटका लावून गेला. या घटनेची आठव म्हणून बालकवींचे स्मारक आजही रेल्वे स्टेशनवर उभे आहे.

# सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. ५ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## देवांशी गावंडे वाणिज्य शाखेत बारावी परीक्षेत जिल्ह्यात प्रथम

**अकोला:** देवांशी आनंद गावंडे बारावीच्या परीक्षेत वाणिज्य शाखेतून जिल्ह्यात पहिली आली. ९८.३ टक्के गुण मिळवले. एल.आर.टी. कॉलेजची विद्यार्थिनी असलेल्या देवांशीने कोणत्याही खाजगी ट्यूशनचा आधार घेतला नाही.

देवांशी केवळ अभ्यासातच नाही, तर क्रीडा क्षेत्रातही अव्वल आहे. ती या वर्षाची 'अंडर-१९' बुद्धिबळ चॅम्पियन आहे. याच वर्षी तिने दोन राष्ट्रीय स्तरावरील बुद्धिबळ स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता.



एका राष्ट्रीय स्पर्धेत तिला सुवर्णपदक प्राप्त झाले आहे. भविष्यात तिला सीए व्हायचे आहे. तसेच बुद्धिबळात चमक दाखवायची आहे.

## अकोला-तांदळी-विवरा बस सेवा पुन्हा सुरू

**पातूर :** अकोला जिल्ह्यातील ग्रामीण भागातील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी राज्य परिवाहन महामंडळाने एक सकारात्मक पाऊल उचलले आहे. गेल्या काही दिवसांपासून बंद असलेली अकोला-तांदळी-बाभुळगाव-विवरा ही एस.टी. बस सेवा आता पुन्हा एकदा प्रवाशांच्या सेवेत रुजू होणार आहे. या मार्गावर बस सेवा सुरू करण्याबाबत श्री. आकाश पारसकर यांनी महामंडळाकडे पाठपुरावा करून निवेदन सादर केले होते. त्यांच्या या मागणीची दखल घेत अकोला विभागाच्या विभाग नियंत्रकांनी ही बस सेवा पूर्ववत करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात विभाग नियंत्रक कार्यालयाने अकोला आगार क्रमांक १ च्या व्यवस्थापकांना लेखी पत्र पाठवून तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अकोला ते विवरा या मार्गावरील बस सेवा बंद असल्याने तांदळी आणि बाभूळगाव परिसरातील ग्रामस्थांना, विशेषतः विद्यार्थ्यांना आणि नोकरदारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता ही सेवा पुन्हा सुरू होणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. महामंडळाने घेतलेल्या या निर्णयाचे स्थानिक नागरिकांकडून स्वागत होत असून, लवकरच या मार्गावर एसटी धावताना दिसेल.

# पश्चिम बंगालमधील भाजपच्या ऐतिहासिक विजयाचा अकोला भाजपकडून जल्लोष

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवत इतिहास रचला. तर आसाम व पाँडिचेरीमध्ये लागोपाठ तिसऱ्यांदा सत्ता मिळवत भाजप-एनडीएने हॅट्रिक साधली. महाराष्ट्रातील निवडणुकीतही भाजपला अभूतपूर्व यश मिळाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा व भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या नेतृत्वाखाली मिळालेल्या या विजयाचा जल्लोष अकोल्यात जयप्रकाश नारायण चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह व भारतीय जनता पार्टी कार्यालयासमोर आतिषबाजी, ढोल-नगारे वाजवून, पेढे वाटप करून साजरा करण्यात आला.



यावेळी आमदार रणधीर सावरकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, विजय अग्रवाल, महापौर शारदाताई खेडकर, उपमहापौर अमोल गोगे, माधव मानकर, अंबादास उमाळे, डॉ. शंकरराव वाकोडे, अॅड. देवाशिष काकड, पवन महल्ले, सिद्धार्थ शर्मा, वसंत बाछुका, वैशाली शेळके, पुरुषोत्तम पानझाडे, दिलीप मिश्रा, चंदा शर्मा, चंदा ठाकूर, किशोर वारोकार, संदीप गावंडे, नितेश पाली, तुषार भिरड, निलेश निनोरे, हेमंत शर्मा, रुपेश ठाकूर, रुपेश यादव, अमोल गीते, रमेश करिहार, मंजुषाताई शेळके, शितल जाईल, प्रशांत जोशी, कन्या आऊजा, संदीप शेगोकार, राजू थोरवे, विनोद मापारी, राम खरात, पल्लवी मोरे, नारायण बोर्डे, उमेश श्रीवास, रोहित चौरसिया, डॉ. अमित कावरे, किशोर कुचके, गणेश लोड, रणजीत खेडकर, मनीष बाछुका, कृष्णा पांडे, संजय झाडोकार, राजेंद्र गिरी, गोपाल मुळे, संजय कोरडे, अॅड. नितीन गवळी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार रणधीर सावरकर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा व राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांच्या नेतृत्वाखाली पश्चिम बंगालमध्ये भाजपने इतिहास घडवला आहे. तुष्टीकरणाच्या राजकारणाला जनतेने नाकारले. आसाम व पाँडिचेरीत हॅट्रिक करून जनतेने विकास, हिंदुत्व व राष्ट्रवादावर शिक्कामोर्तब केले.

## नवाब उर्दू जुनियर कॉलेज ऑफ सायन्सचे चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत प्रथम श्रेणीत



प्रतिनिधी ५ मे

**मुर्तीजापुर:** स्थानिक नवाब ज्युनि.कॉलेज ऑफ सायन्स मध्ये या शैक्षणिक वर्षात शाळेचा निकाल ८६.२० टक्के लागलेला आहे यामध्ये मुले व मुले यांचा समावेश आहे. दरवर्षीची गुणवत्तेची परंपरा यावर्षी देखील शाळेने कायम ठेवलेली आहे. शिफा महेक अब्दुल वहीद (७४.८४ %), अयमन शिफा अबरारोदिन ( ७१.५० %), निगारीश जहाँ हारून चाऊस (७०.६७ %), मदीया महेरोज शेख रशीद (६८.१७ %) या विद्यार्थी / विद्यार्थिनी चार संचालक मंडळ ,व्यवस्थापन कमिटी ,मुख्याध्यापकासह वर्गशिक्षक यांनी या वर्षाच्या निकालात गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी विद्यार्थिनींचा सत्कार केला व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या!

## आलेगावच्या जैन कॉलेजची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी ५ मे

**आलेगाव:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, पातूर तालुक्यातील महाविद्यालयांनी आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. यामध्ये आलेगाव येथील गुरु गणेश मिश्री जैन कनिष्ठ महाविद्यालय आणि कार्ला येथील सुधाकरराव नाईक कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट यशाची नोंद केली आहे.



गुरु गणेश मिश्री जैन कॉलेज, आलेगाव: आदिवासी बहुल व दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहोचवणाऱ्या या महाविद्यालयाने १०० टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. विज्ञान शाखेतील १५० पैकी १५० विद्यार्थी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले. कला शाखेचा निकालही १०० टक्के लागला आहे. विज्ञान शाखेतून निर्मिती जैन (९१%), आचल ढोले (८७ %) व नवीशा पवार (८६ %) यांनी यश मिळवले, तर कला शाखेतून पल्लवी झळके (७४%), निकिता चोथवे (७०%) व अंकिता ससाने (६९%) यांनी बाजी मारली.

सुधाकरराव नाईक महाविद्यालय, कार्ला: या महाविद्यालयाचा एकत्रित निकाल ९६.९२% लागला आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९८.७८ % तर कला शाखेचा ९३.७५% लागला. एकूण १३२ विद्यार्थ्यांपैकी १८ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी, तर ८२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळवून यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले असले तरी, एक महत्त्वाची भावनाही बोलून

## सनराईज ज्ञानपीठ सस्तीच्या तिन्ही शाखेचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी ५ मे

**पातूर:** तालुक्यातील सस्ती येथील आझाद कलम अल्पसंख्यांक बहुउद्देशीय संस्था सस्ती द्वारा संचालित सनराईज ज्ञानपीठ इंग्लिश स्कूल अँड ज्यु. कॉलेज सस्ती सलग ९ व्या वर्षी सुद्धा १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.सत्र २०२५-२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेला बसलेले कला, वाणिज्य व विज्ञान या तिन्ही शाखेचे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. या महाविद्यालयाचे बारावीच्या परीक्षेला एकूण ३३७ विद्यार्थी



बसले होते ते सर्व उत्तीर्ण झालेले असून ३२३ विद्यार्थ्यांनी प्राविण्य श्रेणी प्राप्त केली आहे. यामध्ये आदिती तराळे ९३.८३ टक्के, आर्यन ताले ९२.८३ टक्के, वेदांत माणिकराव ९२.१७ टक्के, वेदिका सावळे ९२.०० टक्के, कावेरी कुटे ९१.८३ टक्के, वेदिका अवतीरक ९१.६७, पृथ्वी देशमुख ९१.३३, रिद्धीमा गणोरकर ९१.३३, स्नेहा वानखडे, आदिती महाले, मृणाल वाकोडे ९०.६७, प्रतीक्षा राऊत व पूर्वा वाढोकार ९०.५० टक्के अशी विद्यार्थ्यांनी टक्केवारी मिळवलेली आहे. विशेष म्हणजे विज्ञान, कला व वाणिज्य तिन्ही शाखेचा शंभर टक्के निकाल लागणारे सनराईज ज्ञानपीठ पातूर तालुक्यातील एकमेव कॉलेज आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष अँड. श्रीकांत ताले, चैताली ताले, शेख इरफान, उमाकांत ताले, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.सदर विद्यार्थ्यांचे कौतुक करताना अँड. ताले म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या कष्टांचे, पालकांच्या विश्वासाचे व आमच्या शिक्षक टीमच्या समर्पणाचे फळ आहे.

## दोन सराईत गुन्हेगार ३ जिल्ह्यांतून तडीपार

प्रतिनिधी ५ मे



**मूर्तिजापूर :** अकोला जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसावा, या उद्देशाने अकोला जिल्हा पोलीस दलाने मोठी कारवाई केली आहे. माना पोलीस स्टेशन हद्दीतील दोन सराईत गुन्हेगारांना अकोला, वाशिम आणि अमरावती जिल्ह्यांतून ६ महिन्यांकरिता तडीपार (हद्पार) करण्यात आले आहे.

जमीर अहमद मुमताज अहमद रा. माना, ता. मूर्तिजापूर हा गो तस्करी व अन्य गुन्ह्यात सामील होता व उमेश सुरेश गोंडाणे रा. माना हा सराईत गुन्हेगार शरीराविरुद्धचे गंभीर गुन्हे आणि अवैध दारू विक्रीच्या गुन्ह्यांमध्ये सहभागी होता. उपविभागीय दंडाधिकारी, मुर्तिजापूर यांच्या आदेशान्वये या दोन्ही सराईत गुन्हेगारांना ३ जिल्ह्यांतून ६ महिन्यांकरिता हद्पार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, आणि मुर्तिजापूर उपविभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी पो. नि. शंकर शेळके, माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार, पो.उपनि. गणेश महाजन, पोलीस हवालदार मनोहर इंगळे, आणि पोलीस कॉन्स्टेबल सुशील आठवले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# विद्युत तारेचे ट्रकला स्पर्श, सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

प्रतिनिधी ५ मे

**कुटासा:** तालुक्यातील देवरी फाटा येथे अकोट-शेगाव मुख्य मार्गावर एक धक्कादायक आणि जीवघेणा प्रकार घडला. मालवाहू ट्रक जात असताना रस्त्याच्या वरून गेलेल्या जिवंत विद्युत तारांना ट्रकचा स्पर्श झाला. या स्पर्शानंतर काही मिनिटे आगीचे गोळे उसळत असल्याचे भीषण दृश्य परिसरात पाहायला मिळाले. घटनेनंतर काही वेळाने विद्युत पुरवठा खंडित करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. तरीही मुख्य रस्त्यावर अशा प्रकारे कमी उंचीवर असलेल्या तारांमुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान बोरचाटे यांनी महावितरणवर तीव्र शब्दांत टीका करत प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, ठमुख्य मार्गावर अशा प्रकारे कमी उंचीवर विद्युत तारा लोंबत



सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, काही काळासाठी वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. घटनेमुळे वाहनचालक आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या कडे महावितरणचे दुर्लक्ष असणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. महावितरणच्या हलगर्जीपणामुळे आज मोठी दुर्घटना टळली, पण उद्या जीवितहानी झाली तर जबाबदार कोण? संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करून तारा योग्य उंचीवर नेण्यात याव्यात.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या मार्गावरून जाणाऱ्या विद्युत तारा अत्यंत कमी उंचीवर लोंबत असून, मोठ्या वाहनांना गंभीर धोका निर्माण होत आहे. वारंवार तक्रारी करूनही महावितरण विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांनीही संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन विद्युत तारा सुरक्षित उंचीवर नेण्याची व कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची जोरदार मागणी केली जात आहे.

## महाराष्ट्र दिनी सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये विद्यार्थी सन्मान सोहळा उत्साहात साजरा

वि.प्रतिनिधी ५ मे

**अकोट:** स्थानिक श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे ०१/०५/२०२६ महाराष्ट्र दिन व विद्यार्थी सन्मान सोहळा साजरा करण्यात आला.




कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया उपाध्यक्ष लूणकरन डागा, सचिव प्रमोद चांडक, दिपम लखोटिया व शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावती, रिंकू अग्रवाल, शाळेचे व्यवस्थापक प्रभुदास नाथे, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे, वैशाली गावत्रे यांची मंचावर उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला झेंडावंदन करण्यात आले.नंतर इ.९ वी.च्या विद्यार्थिनींनी पाहुण्यांचे स्वागत स्वागत गीताने केले. व त्यांना साथ अर्चना रायबोले व योगेश चेडे यांनी दिली. इ. ८ वी.च्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले. व त्यांना मार्गदर्शन सुदर्शन अंभोरे यांनी केले.नर्सरी ते नववीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. महाराष्ट्र दिनी इ. ९ ची विद्यार्थी अभिनव माकोडे, धनश्री आकोटकर, यांनी भाषणे दिली. मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व सांगून गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. व सन्मानित शिक्षक व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.शाळेचे सचिव प्रमोद चांडक यांनी महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देऊन सत्कारित विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया यांनी सन्मानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कार्याची स्तुती केली व गुणवंत विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहन करत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन युगंधरा वाळके, पूजा राऊत, धनश्री जोशी,मयुरी हुतके व आभार प्रदर्शन रश्मी बेराड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# डवले कॉलेजचा बारावीचा १०० टक्के निकाल

प्रतिनिधी ५ मे

### ◆ आशी गोयनका ९३.३३ टक्के गुणांसह बोर्डात सर्वप्रथम



**अकोला:** डवले कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला. सातत्यपूर्ण परिश्रम, योग्य मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, परिपूर्ण नोट्स आणि विषय तज्ञांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले आहे असे प्रतिपादन प्राचार्य प्रकाश डवले यांनी केले. कॉलेजची विद्यार्थिनी आशी मोहन कुमार गोयनका हिने ५६० गुण (९३.३३ज्ञ्) मिळवत अमरावती बोर्डात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे कॉलेजची यशाची परंपरा अकोला शहरात कायम राखली आहे.

इतर गुणवंत विद्यार्थी तनिष्का नितीन सामल ५५८ गुण (९३ज्ञ्) राधिका नितीन देशमुख ५५६ गुण (९२.६७ज्ञ्) फातिमा हकीमुद्दिन बट्टीवाला ५५६ गुण (९२.६७ज्ञ्) ज्ञानदा राजेश खुमकर ५५३ गुण (९२.१७ज्ञ्) संस्कृती संतोष नेमाडे ५५१ गुण (९१.८३ज्ञ्) निमिषा प्रसाद शिंपी ५४५ गुण (९०.८३ज्ञ्) विशेष म्हणजे, डवले कॉलेजने २०२२, २०२३, २०२४ आणि २०२५ या सलग वर्षांमध्येही बोर्डात प्रथम येण्याची परंपरा कायम राखली आहे. दोन्ही शाखांमध्ये १००ज्ञ् निकाल लागल्यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जेईई, निट परीक्षांबरोबरच बोर्ड परीक्षेतही डवले कॉलेजने आपली आघाडी सिद्ध केली आहे. मागील वर्षी विद्यार्थिनी अनुभा राठी हिने १००ज्ञ् गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान मिळवला होता, ही बाबही अभिमानास्पद आहे. यशाबाबत प्राचार्य प्रकाश डवले सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत हे यश शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संयुक्त परिश्रमाचे फलित असल्याचे सांगितले. तसेच सचिव मृणालिनी डवले मॅडम, संचालक डॉ. अभिजीत डवले आणि डॉ. आदित्य डवले, सौ प्राची धीनमीने, सौ. सविता धनोकार, सौ कविता बलिंगे, सौ वैशाली निवाने, सौ श्वेता तायडे, कु दिपाली चिकटे, वररुची खेडकर, सौ रजनी पांडे, सौ स्वाती बोरोडे, सौ श्रद्धा देशपांडे, सौ इतिका दुबे, कु. पारिजात पुनसे, सागर लोखंडे, श्याम सुलताने, किशोर स्वर्गे, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी प्रथम आपले लक्ष / यश निश्चित करावे नंतर योग्य दिशेने योग्य प्रयत्न करावे. मोबाईलचा वापर कमी करावा केवळ ऑनलाईन अभ्यासावर अवलंबुन न राहता प्रिंटेड नोटस् नियमित सराव परीक्षा पेपर वेळेमध्ये सोडविण्याचे अचुक नियोजन अतिआत्मविश्वास न ठेवता शांतपणे ध्येय निश्चीत करावे. आई वडील, नातेवाईक, गुरुजन यांचा आदर करावा व यशोप्राप्ती नंतरच त्याचा विजय साजरा करावा असा सल्ला प्रा. प्रकाश डवले यांनी दिला.


समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर,
प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
1)अनुभवी शिक्षकवृंद
2)सुसज्ज पायाभूत ईमारत
3)दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
4)सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
5)आनंददायी शिक्षण पध्दती
6)CCTV ची सुविधा
7)कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
8)सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरू आहे.
1)इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
2)इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
3)शालेय पोषण आहार



माँ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790, 9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. ५ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आठवडी बाजारात चोरट्यांचा सुळसुळाट

मोबाईल चोरीच्या घटनांत वाढ

## गर्दीचा फायदा घेत ग्राहकांना लक्ष्य; पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी

प्रतिनिधी ५ मे

**उमरखेड** : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या यार्डमध्ये दर शनिवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात चोरट्यांचा सुळसुळाट वाढला असून, अनेक ग्राहकांचे महागडे मोबाईल लंपास झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. शनिवारी झालेल्या प्रचंड गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी ग्राहकांच्या खिशातून व पर्समधून मोबाईल चोरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागातील ताजा भाजीपाला मिळत असल्याने या बाजारात शहरासह परिसरातील नागरिक, विशेषतः महिलांची मोठी गर्दी होत असते. याच गर्दीत मिसळून चोरटे



आपले डाव साधत असल्याचे दिसून येत आहे. काही पीडित ग्राहकांनी या प्रकारांमागे महिला चोरट्यांची टोळी सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

या पार्श्वभूमीवर उमरखेड पोलीस ठाण्याने आठवडी बाजार परिसरात नियमित गस्त वाढवावी, तसेच साध्या वेशातील पोलिसांची नेमणूक करून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. बाजार समितीच्या यार्डमध्ये कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त तैनात करून सीसीटीव्हीच्या माध्यमातून देखरेख वाढवावी, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून नागरिकांनी पोलीस प्रशासनाला या प्रकारांकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन केले आहे.

> ■ भरबाजारात घडणाऱ्या या चोरीच्या घटनांमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक नुकसान होत असून, सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. "भाजीपाला खरेदी करताना मोबाईल कधी चोरीला गेला हे समजलेच नाही," अशी प्रतिक्रिया एका पीडित ग्राहकाने दिली.

# पूस नदीत २ दशलक्ष घनमीटर पाणी सोडण्याचे आदेश

प्रतिनिधी ५ मे

**महागाव** : तालुक्यातील पूस नदीकाठावरील १२ गावांमध्ये निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी महत्त्वाचा निर्णय घेत अधर पूस (वेणी धरण) प्रकल्पातून २.०० दशलक्ष घनमीटर (द. ल. घ. मी.) पाणी पूस नदीच्या पात्रात सोडण्याचे आदेश दिले आहेत.

> ■ सध्या तालुक्यात पाण्याची भीषण टंचाई जाणवत असून पूस नदीचे पात्र पूर्णपणे कोरडे पडले आहे. यामुळे जनावरांना पाणी मिळत नसल्याची ओरड शेतकऱ्यांकडून केली जात होती. या पार्श्वभूमीवर भाजपचे समन्वयक नितीन भुतडा यांनी प्रशासनाकडे पाणी सोडण्याची मागणी केली होती.

यानंतर महागाव पंचायत समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व तहसीलदार यांनी प्रस्ताव सादर केला. २०२५-२६ या वर्षासाठी अधर पूस प्रकल्पात एकूण ५.५० द. ल. घ. मी. पाणी आरक्षित ठेवण्यात आले होते. सध्या प्रकल्पात ३५.३८ द. ल. घ. मी. पाणीसाठा उपलब्ध असून त्यापैकी २.०० द. ल. घ. मी. पाणी सोडण्यास प्रशासनाने मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे नदीकाठावरील गावांना तात्पुरता दिलासा मिळणार असून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याच्या समस्येतही काही प्रमाणात सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पीक विमा व नरसापूर प्रकरणी कारवाईची मागणी

## झरी जामणी काँग्रेसकडून पंतप्रधानांना निवेदन



प्रतिनिधी ५ मे

**झरी जामणी** : तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुका अध्यक्ष संदीप उर्फ लक्ष्मण भाऊराव बुर्रेवार यांनी पंतप्रधानांना तहसीलदार मार्फत सविस्तर निवेदन सादर केले. या निवेदनात यवतमाळ जिल्ह्याला पीक विमा योजनेतून वगळण्यात आल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ पुनःसमावेश करण्याची मागणी करण्यात आली आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर व माजी आमदार वामनराव कासावार यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, यवतमाळ जिल्हा हा शेतीप्रधान असून बहुतांश शेतकरी पीक विम्यावर अवलंबून आहेत. सध्याच्या परिस्थितीत जिल्ह्याची आणेवारी सुमारे ४८ टक्के असून झरी जामणी तालुक्यातील चारही मंडळांची आणेवारी ५० टक्क्यांखाली आहे.

तरीदेखील शेतकऱ्यांना पीक विम्यापासून वंचित ठेवण्यात येत असल्याने हजारो शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

मागील वर्षी शेतकरीनिहाय नुकसानभरपाई मिळत होती; मात्र यंदा अतिवृष्टीमुळे नुकसान होऊनही विमा मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासनाने स्पष्ट धोरण जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अन्यथा आंदोलन किंवा उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे.

तसेच नरसापूर येथील चार वर्षीय बालिकेवरील अत्याचार प्रकरणातील आरोपीस तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये कठोर शिक्षा दिल्यासच समाजात भीती निर्माण होईल व न्यायव्यवस्थेवरील विश्वास टिकून राहील, असे मत व्यक्त करण्यात आले.

या निवेदनावेळी राजीव कासावार, प्रकाश कासावार, प्रकाश मैकलवार, भगवान चुक्कलवार, हरिदास गुर्जलवार, गंगाधर आत्राम, राकेश गालेवार, हरी झाडे, वसंत राडेवार आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

# जे.एस.पी.एम.उर्दू जुनियर कॉलेजचा 100% निकाल

प्रतिनिधी ५ मे

**फुलसावंगी** : महागाव तालुक्यातील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित उर्दू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स, फुलसावंगी यांनी यंदाही उत्कृष्ट निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी–मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता 12 वी (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला.

या परीक्षेत महाविद्यालयाच्या कला शाखेचा 100% निकाल लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. या परीक्षेत कु. तहेरीन फातेमा (81.17%) यांनी प्रथम क्रमांक, तर शेख फलक (79.50%) यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मुजम्मिल खान (78.17%), अलमास ज़ोहरा (75%), ज़िकरा तलत (74.67%), आयशा सिद्दीका (73.17%), महेरीन जहान (70.50%), ज़ेबा नाज़ (70.17%), सुहाना कौसर (69.83%), राहीन अंजुम (68.17%), मारिया अंजुम (66.33%), अलमेरा सैय्यद (63.83%), नेहा परवीन (63.17%), सुफियान शेख (63%), सोहेल खान (62.17%), मोहम्मद रेहान (62%), शिफा खान (60.83%), अर्शिया नाज़ (60%) व अयान खान (60%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मोहम्मद मुसद्दीक, आकीब रिझवी, नजीर खान, वसीम रिझवी, सैय्यद मुजाहिद, शाहिद खान, शबीना बाजी, सुमय्या बाजी, इरफान देशमुख, रफिक गौरी, रफिक नवाब, मुझफ्फर शेख तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालक व नागरिकांकडूनही संस्थेचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# उमरखेड–पुसद मार्गावर धुळीचे साम्राज्य; वाहनचालक हैराण

प्रतिनिधी ५ मे

**उमरखेड** : उमरखेड–पुसद राज्यमार्गावरील रस्ते विकासाचे काम सुरू असले तरी योग्य नियोजनाअभावी वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या एका बाजूचे काम सुरू ठेवून दुसरी बाजू खोदून ठेवण्यात आल्याने या मार्गावर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. विशेषतः उमरखेड शहरातील कृष्ण मंदिर परिसर ते पळशी–पोफाळी (कॅनॉल) व पुढे वसंतनगरपर्यंत ही परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.

मागील काही दिवसांत कधी काम सुरू तर कधी बंद अशी स्थिती



असल्याने वाहतुकीवर परिणाम होत आहे. एका बाजूने वाहतूक सुरू असल्याने वाहनांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, एखादे जड वाहन गेले की मागे प्रचंड धुळीचे ढग निर्माण होत आहेत. याचा फटका दुचाकी व लहान वाहनचालकांना बसत असून, दृष्टी कमी झाल्याने किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत आहेत.

नियमांनुसार अशा कामांदरम्यान दिवसातून किमान दोन वेळा रस्त्यावर पाण्याची फवारणी करणे अपेक्षित असते. मात्र संबंधित कंत्राटदारांकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. परिणामी धुळीमुळे वाहनचालकांच्या डोळ्यांना त्रास, श्वसनाचे आजार वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राज्य शासनाकडून रस्ते विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला असताना कामाची गती आणि गुणवत्ता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन नियमित पाण्याची फवारणी करून धुळीवर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ३० जूनपर्यंत हयातीचे प्रमाणपत्र सादर करा : लाभार्थ्यांना आवाहन

प्रतिनिधी ५ मे

**यवतमाळ :** यवतमाळ न. प. च्या ५ टक्के राखीव निधीतून दिव्यांग कल्याण कक्षामार्फत न. प. हद्दीतील नोंदणी केलेल्या लाभार्थी दिव्यांग व्यक्तींना सानुग्रह अनुदान/ उदरनिर्वाह भत्ता/आर्थिक सहाय्य देण्यात येते या योजनेचा लाभ मिळत असलेल्या बांधवांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात लाभ घेण्यासाठी आपले हयात प्रमाणपत्र सादर केल्याखेरीज त्यांना लाभ देता येणार नसल्याने त्या नोंदणीकृत दिव्यांग व्यक्तींनी दिनांक १ एप्रिल ते ३० जून २०२६ पर्यंतच्या कालावधीत आपले हयातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार लाभार्थी दिव्यांग व्यक्तींनी न. प. च्या आवक जावक विभागात अथवा न. प. दिव्यांग कक्षात सदरचे प्रमाणपत्र सादर करावे. असे एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे न. प. प्रशासनाच्या अधिकृत सूत्रांनी कळविले आहे.


# महाराजांच्या पुतळ्यासमोरील पेट्रोल पंपावरुन कृती समिती आक्रमक

## लिज रद्द करण्याची मागणी : सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी ५ मे

**उमरखेड** : शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोरील भारत पेट्रोलियम (BPCL) कंपनीच्या पेट्रोल पंपाच्या प्रश्नावरून वातावरण पुन्हा तापले असून, कृती समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. संबंधित पेट्रोल पंपाची लिज तात्काळ रद्द करून जागा शासन ताब्यात घ्यावी, अशी मागणी करत उपविभागीय महसूल अधिकारी व सार्वजनिक बांधकाम उपविभागामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना ४ मे रोजी निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित पेट्रोल पंपासाठी २००२ साली केवळ एका वर्षासाठी मुदतवाढ मागण्यात आली होती. ही मुदत ३ ऑक्टोबर २००३ रोजीच



संपुष्टात आली असून, त्यानंतर लिज वाढविण्यास कोणताही कायदेशीर आधार नसल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या या पेट्रोल पंपाजवळ नगर परिषदेचे मंगल कार्यालय तसेच प्राचीन हनुमान मंदिर आहे. येथे लग्नसमारंभ व धार्मिक कार्यक्रमांदरम्यान मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी केली जाते.

> ■ नगर परिषद उमरखेडने यापूर्वी १९७५, २००२ तसेच २९ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विशेष सभेत पेट्रोल पंप हटविण्याचे ठराव एकमताने मंजूर केले होते. तरीदेखील जनभावनांकडे दुर्लक्ष करून लिज वाढविण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

त्यामुळे संभाव्य आगीचा धोका निर्माण होऊन परिसरातील बाजारपेठ धोक्यात येऊ शकते, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याशिवाय, संबंधित पेट्रोल पंपावर स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह व इतर आवश्यक नागरी सुविधा नसल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यामुळे अशा सुविधा नसलेल्या पेट्रोल पंपाचा परवाना निलंबित करून तो तात्काळ बंद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच २१ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशानुसार कोणताही नवीन करारनामा नोंदवू नये व सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमण हटवून तातडीने अहवाल सादर करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावेळी अध्यक्ष अभय गोविंदराव पवार, उपाध्यक्ष रमेश गुलाबसिंग चव्हाण, बसेश्वर क्षिरसागर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. शहरातील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने तात्काळ निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# शेंद्री बु. येथे बुद्ध जयंती साजरी

प्रतिनिधी ५ मे

**दारव्हा** : तालुक्यातील शेंद्री बु. येथे समता सैनिक दल यशोधरा महिला मंडळ तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंडळ यांच्या वतीने बुद्ध जयंतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदना घेऊन करण्यात आली तर समता सैनिक दल शाखेच्या पदाधिकारी सुजाता सावळे,अर्चना जाधव,उज्वला वरघट,दीक्षा मोहोड व सैनिक गण अर्चना कांबळे, अहिल्या सुरोसे, नंदा मोहोड, कविता इंगळे, कुसुम जाधव, तसेच सरपंच पूजाताई ओले, मालाताई चौधरी (अंगणवाडी सेविका) सत्त्यजित ओले पाटील सर उपस्थित होते.

यावेळी पंचशील ध्वजारोहण सरपंच पूजाताई ओले यांच्या हस्ते करण्यात आले तर समता सैनिक दलाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी मानवंदना तसेच सलामी देण्यात आली.

उपस्थित मान्यवरांनी बुद्ध तत्त्वज्ञानावर अतिशय प्रभावी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसंत मोहोड यांनी केले तर आभार वैशाली मोठघरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोल रंगारी गौतम वरघट जितेश जाधव, सागर मोहोड, राहुल मोहोड, गणेश जाधव, गणेश सुरोसे, मनोज मोठघरे, आशु मोहोड, मंगला मोहोड, मोहोड, काजल रंगारी, सोनू रंगारी, ललित रंगारी, रंजना मोहोड, यशोदा रामटेके इत्यादींनी परिश्रम घेतले.

# अंधश्रद्धा सोडल्याशिवाय महाराष्ट्र बलवान होणार नाही : प्रा.श्याम मानव

प्रतिनिधी ५ मे

**यवतमाळ** : अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीसाठी सर्वात मोठा अडथळा असून महाराष्ट्र व देश बलवान बनवण्यासाठी ती सोडणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन प्रा. श्याम मानव यांनी केले. अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि बिरसा क्रांती दल, यवतमाळ यांच्या वतीने 'बुवा तेथे बाया' या विषयावर आयोजित जाहीर व्याख्यानात ते बोलत होते.




सेलिब्रेशन हॉल येथे शनिवारी झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिरसा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष दशरथ मडावी होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे, राष्ट्रीय संघटक सुरेश झुरमुरे, जिल्हाध्यक्ष प्रा. काशिनाथ लाहोरे, प्रदेशाध्यक्ष डी. बी. अंबोरे आदी उपस्थित होते. प्रा. मानव यांनी आपल्या भाषणात अंधश्रद्धेला खतपाणी घालण्यात राज्य सरकारची भूमिकाही कारणीभूत असल्याचा आरोप केला. काही प्रवचनकार व तथाकथित बाबांकडून चमत्कारांच्या नावाखाली लोकांची दिशाभूल होत असल्याचे त्यांनी नमूद केले. अशा भोंदूगिरीविरोधात अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आव्हान दिले असून त्यासाठी बक्षीसही जाहीर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील सामाजिक परिस्थितीबाबत चिंता व्यक्त करत त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज अधोरेखित केली. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी समाजाने विवेकाचा मार्ग स्वीकारणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी काही काळ वीज खंडित झाली होती. तरीही उपस्थितांनी शांततेत संपूर्ण व्याख्यान ऐकले. यावेळी प्रा. मानव यांचा मानपत्र व संविधानाची प्रत देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. काशिनाथ लाहोरे यांनी केले. सूत्रसंचालन मृणाल बिहाडे यांनी तर आभार प्रदर्शन माधुरी फेंडर यांनी केले.

# आर्णीत तालुका माहेश्वरी संघटनेची कार्यकारिणी जाहीर



प्रतिनिधी ५ मे

**आर्णी** : येथील तालुका माहेश्वरी संघटनेची नवी कार्यकारिणी नुकतीच सर्वानुमते गठीत करण्यात आली. यासाठी आर्णी येथे माहेश्वरी समाजाची सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत मोठ्या उत्साहात निवड प्रक्रिया पार पडली.

नव्या कार्यकारिणीत अध्यक्षपदी विनोद धनराजजी माहेश्वरी (चांडक) यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी महेश शामसुंदर पनपालिया, सचिवपदी प्रदीप राधेशामजी राठी, कोषाध्यक्षपदी विशाल विनोराज माहेश्वरी, सहसचिवपदी अक्षय सुरेश राठी, संघटकपदी संदीप रामचंद्र काकाणी, तसेच प्रचार-प्रसार मंत्री पदासाठीही सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

निवडणूक प्रक्रिया निवडणूक अधिकारी पवन नंदलाल पनपालिया व सहकारी अधिकारी राजेश माहेश्वरी यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

यावेळी नवनियुक्त अध्यक्ष विनोद धनराजजी माहेश्वरी यांनी आपल्या कार्यकाळात समाजासाठी अथक प्रयत्न करून समाजाची सेवा करण्याचे मनोगत व्यक्त केले. सभेला आर्णी तालुक्यातील माहेश्वरी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज अमरावती
मंगळवार, दि. ५ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# स्वाधार योजनेच्या त्रुटी पूर्ततेसाठी समाज कल्याण विभागाची विशेष कार्यशाळा

**अमरावती:** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटींमुळे (परत) करण्यात आले आहेत, त्यांच्यासाठी सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय, अमरावती येथे विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ३० एप्रिल ते ५ मे २०२६ या कालावधीत दुपारी ३ ते ५ या वेळेत पार पडणार असून, विद्यार्थ्यांनी स्वतः उपस्थित राहून त्रुटी दूर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासकीय वसतिगृहांची संख्या मर्यादित आहे. यामुळे अनेक मागासवर्गीय विद्यार्थी निवासाच्या सुविधेपासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून शासन भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक खर्चासाठी थेट बँक खात्यात रक्कम जमा करते.

# मतदारयादी मॅपिंगचे कार्य तातडीने पूर्ण करावेत- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ५ मे

**अमरावती :** निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनरावलोकन जाहिर केला आहे. त्यानुसार याआधी मतदारांची मॅपिंग करण्यात येत आहे. यात मतदारांची मॅपिंग झाली नसल्यास त्यांना नोटीस देऊन सुनावणी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे मॅपिंगचे कार्य तातडीने पूर्ण करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवनात मतदारांच्या मॅपिंगबाबत आढावा घेण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, महापालिकेचे उपायुक्त महेश देशमुख, योगेश पिटे, तहसिलदार विजय लोखंडे आदी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी . येरेकर यांनी निवडणूक आयोगाने नेमून दिलेले कार्य वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. विशेष संक्षिप्त पुनरावलोकन कार्यक्रमाची जबाबदारी बीएलओवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे सध्याच्या मतदारयादीतील मतदारांचा २००२च्या मतदारयादीत शोधावे लागणार आहे. यासाठी ॲप विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे बीएलओंनी प्रत्येक मतदारांचा शोध घेऊन मॅपिंग करणे आवश्यक आहे. मॅपिंगची टक्केवारी कमी झाल्यास उर्वरीत मतदारांना नोटीस देऊन सुनावणी घ्यावी लागणार आहे. हे काम अत्यंत जिकरीचे होणार असल्याने बीएलओंनी मॅपिंगची टक्केवारी वाढविणे आवश्यक आहे.

जिल्ह्यात प्रामुख्याने बडनेरा आणि अमरावती या शहरी भागात मॅपिंगची गती वाढविणे आवश्यक आहे. मतदारांची मॅपिंग झालेली नसल्यास मतदारयादीतील नाव वगळण्याआधी मतदारांकडून फॉर्म नं. सात भरून घेण्याची कारवाई करावी. कमी मॅपिंग झालेल्या क्षेत्रातील मॅपिंगची टक्केवारी वाढविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ पुरविले जाणार आहे. त्यामुळे येत्या १५ मेपर्यंत ९५ टक्के मॅपिंग होण्यासाठी बीएलओंनी प्रयत्न करावेत. मॅपिंगच्या कामी खासगी संस्थांमधील कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित संस्थांनाही पत्र देऊन बीएलओंना शाळेतील कामामधून सूट देण्याची सूचना करण्यात येणार आहे. मॅपिंगच्या कामात अडथळा आणल्यास संबंधित बीएलओंवर फौजदारी कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे बीएलओंनी मॅपिंगचे काम काटेकोरपणे पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले.

सुरवातीला उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी मतदारांच्या मॅपिंगबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी मॅपिंगचे कार्य उत्कृष्टरित्या केलेल्या बीएलओंनी मनोगत व्यक्त केले.

# बंगालचा निकाल आणि भाजपचा जल्लोष



प्रतिनिधी ५ मे

**अमरावती :** पश्चिम बंगालच्या बीजेपीच्या ऐतिहासिक विजयाबद्दल राजापेठ अमरावती बीजेपी कार्यालयासमोर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन जल्लोष केला. जय श्रीराम. भारत माता की जय. अशा घोषणा देण्यात आल्या. झालमंडी ( कच्चा चिवडा ) एकमेकांनाभरवून आनंद उत्सव साजरा केला.

भाजपचे जिल्हा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, भाजपचे प्रवक्ते शिवराय कुलकर्णी, नगरसेविका सुरेखा लुंगारे, माजी शहराध्यक्ष किरण पातुरकर त्यांच्यासह भाजपाचे सर्वच पदाधिकारी उपस्थित होते.



दर्यापूर भाजपच्या वतीने बंगालचा निकाल भाजपच्या बाजूला लागल्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी जल्लोष केला.

# महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते विविध कामांचे भूमिपूजन उत्साहात

प्रतिनिधी ५ मे

**अमरावती:** अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या शुभहस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन रविवार दि. ०३/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता पप्पू लेखवानी यांच्या घराजवळ मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमात कॉंक्रीट रस्ता व अंडरग्राउंड नाली अशा महत्त्वपूर्ण नागरी सुविधांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला. परिसरातील नागरिकांसाठी दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

भूमिपूजन करण्यात आलेली कामे कॉंक्रीट रस्ता ,सुरेश गाडीचा ते पप्पू लेखवानी, हरेश पंजाबी ते शिव मंदिर ग्राउंड कॉर्नर अंडरग्राउंड नाली, सुरेश गाडीचा ते एवन ज्वेलर्स, मनोहरलाल सोनी ते पप्पू लेखवानी, रवि मुंडवाणी ते ताराचंद दलवानी या विकासकामांमुळे परिसरातील रस्ते व पाणी निचरा व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार असल्याचे यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी यांनी सांगीतले.

या भूमिपूजन कार्यक्रमास पूज्य पंचायत रामपुरी कॅम्पचे अध्यक्ष डॉ. इंद्रलाल जी गेमनानी, सचिव मोहनलाल जी आहुजा, हरीश जी सुंदरानी, भगवानदास रूपेजा, बक्शाराम गाडीचा, सच्चानंद चंदवानी, रामचंद डोडानी, अंकित गाडीचा, राजेशकुमार तारवानी, सुंदर तारवानी, किशोर पिंजानी, प्रेम माखीजा, भावेश सचदेव, रमेशलाल पिंजानी, विजय थदानी, जीतू थदानी, आशीष बजाज, विक्की खत्री, अजय पोपटानी, विशाल पिंजानी, अनिल जीवतानी, आनंद मंगलानी, अशोक कुकरेजा, गोविंद खत्री, हरीश काछेलानी, महेश खट्टर, मनोहरलाल तख्तानी, पपन मेघानी, प्रकाश उदासी, राजा त्रिकोटी, विजय पुरसानी तसेच परिसरातील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून लवकरच कामे पूर्ण होऊन परिसराचा विकास वेगाने होईल, असा विश्वास यावेळी महापौरांनी व्यक्त केले.

# बुद्ध जयंती महोत्सव विश्वशांती रॅलीने शहर दुमदुमले

♦ आ. सुलभा खोडके व आ.संजय खोडके यांचा सहभाग ♦ बुद्ध सरंण. गच्छामि.. धम्म सरंण. गच्छामि..संघ सरंण.गच्छामि

प्रतिनिधी ५ मे

**अमरावती :** संपूर्ण विश्वाला शांती मैत्री करुणेचा संदेश देणारे महाकारुणिक भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या बुद्ध जयंती निमित्य शहरातील इर्विन चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळापासून ते भीम टेकडी पर्यंत विश्व शांती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये बहुसंख्य अनुयायायी सहभागी होऊन विश्वशांतीचा संदेश दिला. यावेळी सर्वत्र बुद्ध सरंण. गच्छामि.. धम्म सरंण. गच्छामि..संघ सरंण.गच्छामिचा स्वर निनादला होता. दरवर्षी बुद्ध जयंती उत्सव समितीच्या वतीने बौद्ध पौर्णिमेला शहरातून भव्य विश्व शांती रॅलीचे आयोजन करण्यात येते. यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध यांची प्रतिमा एका विशाल रथामध्ये स्थापित



करण्यात आली. यावेळी अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई खोडके व आ.स संजय खोडके यांनी विश्व शांती रॅलीमध्ये सहभागी होऊन समस्त अनुयायांना बौद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. वैशाख पौर्णिमेला सिद्धार्थ गौतमाच्या जन्म झाला, याच दिवशी गौतमाला ज्ञानप्राप्ती झाली व ते सम्यक संबुद्ध बनले, ज्यांनी आपल्या ज्ञानाने मानवतेचा व शांतीचा संदेश देऊन सुखी समृद्ध जीवनाचे तत्वज्ञान मांडले. आणि वैशाख पौर्णिमेलाच गौतम बुद्धांचे महापरिनिर्वाण झाले. म्हणून वैशाख पौर्णिमेला अनन्य साधारण महत्व असून हा दिवस मानवजातीला अंधाराकडून प्रकाशाकडे, शांतीकडे, ज्ञानाकडे व विकासाकडे नेणारा उत्सव असल्याचे सांगून आमदार महोदयांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पिरॅमिड ग्रुपचे संचालक गुणवंत देवपारे , रॅलीचे संयोजक सुनील रामटेके , मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, नगरसेवक मंगेश मनोहर यांचे सह भीम -बुद्ध अनुयायी -उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्ध जयंती रॅली ने विश्वशांतीचा संदेश देऊन बौद्ध सभ्यता व संस्कृतीचा परिचय दिला. यावेळी सर्वत्र बुद्ध सरंण. गच्छामि.. धम्म सरंण. गच्छामि..संघ सरंण.गच्छामिचा स्वर निनादला होता.



अमरावतीचे नवनियुक्त जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांची आरआरसी व सिटी न्यूज सुपर फास्टचे अमरावती जिल्हा प्रतिनिधी संदीप मानकर यांनी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. व आर आर सी न्यूज चॅनल व सिटी न्यूज सुपरफास्ट वृत्तपत्र संदर्भात माहिती दिली.

# कृषी मंत्री यांचे सोबत आ.रवी राणा यांनी बैठकीतून केली चर्चा

♦ रासायनिक खते, बी बियाणे जिल्हास्तरीय दुकानदार संघटना मागण्यांवर व समस्यावर उपाय योजना

प्रतिनिधी ५ मे

**अमरावती:** अमरावती जिल्हा कृषि साहित्य विक्रेता सेवा संघ, अमरावती यांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व कृषी विक्री केंद्रे दि. २७एप्रिल २०२६ पासून बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर आज दि. ३०/०४/२०२६ रोजी मा. आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस संघटनेचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व सुमारे ४० सदस्य उपस्थित होते. तसेच जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राहुल सातपुते, कृषि उपसंचालक वरुण देशमुख, कृषि विकास अधिकारी . प्रविण खर्च, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विराग देशमुख तसेच कृषि अधिकारी (गुणनियंत्रण). शुद्धोधन वरघट



उपस्थित होते. शेतकरी प्रतिनिधी सुनील राणा,मंगेश पाटील इंगोले, अजय घुले, उमेश ढोणे व युवा स्वाभिमान पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उमेश डकरे, सुनील नीचत व शेतकरी उपस्थित होते.

संघटनेच्या निवेदनात रासायनिक खत पुरवठ्यातील बेकायदेशीर लिंकींग बंद करणे, अप्रमाणित. एऊँऊ कपाशी बियाण्यांवर बंदी घालणे, 'साथी' पोर्टलची सक्ती उत्पादक कंपन्यांनाही लागू करणे, रासायनिक खतांचा पुरवठा इंईं पद्धतीने करणे, सॅम्पल फेल झाल्यास विक्रेत्यांना आरोपी न धरता साक्षीदार मानणे, गुणवत्ता तपासणीतील प्रलंबित रक्कम अदा करणे तसेच अवैध व निकृष्ट दर्जाच्या कृषी इनपुट्सवर नियंत्रण ठेवणे अशा विविध प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

बैठकीदरम्यान जिल्हास्तरावरील मागण्यांवर सविस्तर चर्चा करून जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांनी समाधानकारक तोडगा काढल्याचे सांगण्यात आले. तर राज्यस्तरीय मागण्यांबाबत मा. आमदार श्री. रवी राणा यांनी मा. कृषि मंत्र्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून खत लिंकींग, युरिया व डीएपी खतांवरील किमान विक्री अट शिथिल करणे तसेच 'साथी' पोर्टल संदर्भातील अटींबाबत माहिती दिली.

यावर वरिष्ठ स्तरावर तातडीने बैठक घेऊन संबंधित विषय निकाली काढण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व विक्रेता संघटनांनी बैठक यशस्वी झाल्याचे समाधान व्यक्त करत आमदार रवी राणा यांचे आभार मानले.

# विद्युत कंपन्यांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्यापासून पुण्यात आयोजन

♦ कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या स्पर्धेसाठी ४१ संघ सहभागी होणार

प्रतिनिधी ५ मे

**अमरावती :** अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या ४७ व्या राष्ट्रीय कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलच्या क्रीडास्पर्धेचे आयोजन बुधवार (दि. ६) ते शुक्रवारपर्यंत (दि. ८) बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १० राज्यांतील विविध विद्युत कंपन्यांचे पुरुष व महिला गटातील तब्बल ४१ संघ सहभागी होत आहेत.

या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्रासह गुजरात, हरियाणा, तेलंगाणा, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, दिल्ली आदी राज्यांतील सरकारी व खासगी विद्युत कंपन्यांचे ४१ संघ आणि सुमारे ५३८ महिला व पुरुष खेळाडू सहभागी होत आहेत. कबड्डी, कुस्ती, खो-खो व बास्केटबॉलमध्ये पुरुष संघात लढत होईल तर कबड्डी व खो-खोमध्ये महिला संघांचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्पर्धेतील अजिंक्यपदासाठी कबड्डीमध्ये पुरुष व महिला गटातील १८ संघ तर खो-खोसाठी ९ संघ सहभागी होत आहेत. तसेच कुस्ती व बास्केटबॉलमध्ये अजिंक्यपदासाठी पुरुष गटामध्ये प्रत्येकी ७ संघांमध्ये लढत होणार आहे. विद्युत क्रीडा नियामक मंडळाच्या या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन बुधवारी (दि. ६) सकाळी ९.३० वाजता राज्याच्या ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्या मुख्य उपस्थितीत महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी राज्याच्या क्रीडा आयुक्त सौ. शीतल तेली-उगले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. तसेच महावितरण, महानिर्मीती, महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळासह अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. जिग्नेश राय, सरचिटणीस श्री. नरेश कुमार यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तर शुक्रवारी (दि. ८) सायंकाळी ५ वाजता अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार (महापारेषण) व श्री. राधाकृष्णन बी. (महानिर्मिती) यांच्या प्रमुख उपस्थितीत बक्षिस वितरणाचा कार्यक्रम होईल.

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनात या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आयोजन समितीचे अध्यक्ष म्हणून पुणे प्रादेशिक संचालक श्री. सुनील काकडे तसेच उपाध्यक्ष म्हणून मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप (महापारेषण) व अधीक्षक अभियंता श्री. अशोक घाडगे (महानिर्मिती) आणि मुख्य समन्वयक म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके (महावितरण) व श्री. पुरुषोत्तम वारजुरकर (महानिर्मिती) आणि विविध समितीचे प्रमुख व सदस्य कार्यरत आहेत.

# बडनेरा येथे जुगार अड्ड्यावर धाड

प्रतिनिधी ५ मे

**अमरावती:** २ मे रोजी

पोस्टे बडनेरा हद्दी मध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना रत्नदिप मीलींद दाभाडे वय ३८ वर्षे रा बेलोरा, अमरावती हा बडनेरा आठवडी बाजार येथील सोनु मोबाईल चे मागील बाजुस सार्वजनिक ठिकाणी वरली जुगारच्या चिट्ठ्यासह हार जीत चा खेळ खेळताना मिळून आल्या



वरून त्याच्याकडून नगदी ४३२० व पेन किंमत अंदाजे १० असा एकूण ४३३० /- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच फरार आरोपी मिलिंद झंजाळ, शेख शब्बीर शेख बशीर, करीम लाला सर्व रा. नवी वस्ती, बडनेरा त्यांच्या विरुद्ध पोस्टे बडनेरा येथे १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा सहकलम ४९ भा.न्या.सं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि ५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

पाण्याचे करोडो रूपये 'पाण्यात'

## करोडो रूपये भ्रष्टाचारातून कुठे वळविले...

# नळाचे नव्हे तर तोंडचेही पाणी पळविले !

## *जिल्ह्यात अनेक गावात तीव्र पाणी टंचाई * ४० वर्षापासून एकाही गावात सुरू नाही योजना

**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

ग्रामीण भागात जनतेला स्वच्छ पाणी देण्यासाठी शासनाच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वतीने पेयजल योजना राबविण्यात येत आहे. मात्र ४० वर्षापासून वाशीम जिल्ह्यातील करोडो रूपये खर्च करून उभारलेल्या नळ योजनेतून अद्यापही जिल्ह्यातील कोणत्याच गावात पाणी पुरवठा सुरू झाला नसल्याचे चित्र आहे. ज्या गावात सुरू झाला त्या गावात मात्र कागदोपत्री दाखविण्यात आला आहे. त्यामुळे शासनाचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे विभागाचे शेकडो करोडो रूपये तीन वेळा निधी येवूनही 'पाण्यात' गेले आहेत. या विभागात अधिकारी व ठेकेदाराच्या संगणमताने करोडो रूपयाचा महाघोटाळा झाला असून ही योजना सुरू नसतांनाही ग्रामपंचायतीकडून कर वसूली मात्र कशासाठी केल्या जाते असा प्रश्न जनतेला पडला आहे. आता ह्याच योजना जलजीवन मिशनच्या नावाखाली पुन्हा सुरू करण्याऐवजी भ्रष्टाचाराच केल्या जात आहे.फक्त कारंजा शहरातच जलजीवन मिशनची नळ योजना सुरू आहे.

शासनाच्या वतीने ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी जीवन प्राधिकरणची स्थापना करण्यात





आली. मात्र या विभागातील अधिकारी व ठेकेदारांनी वाशीम जिल्ह्यात स्वातंत्र्य काळापासून राबविण्यात आलेल्या योजनेत अंतर्गत एकाही गावात प्रत्यक्षात पाणी पुरवठा केला नाही. भ्रष्टाचाराची वाळवी लागलेल्या ठेकेदारांनी व अधिकाऱ्यांनी संपूर्ण योजनाच हडप केली. लाखो रूपये पगार घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी जनतेकडून मात्र कर वसूली केली. प्रत्यक्षात मात्र कुठेही पाणी पुरवठा केला नाही. आता या भ्रष्टाचारावर पडदा टाकण्यासाठी या योजनेचे पुनरूज्जीवन करून मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रमांतर्गत बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनेला शेकडो करोडो रूपयाचा निधी तीन वेळा प्राप्त झाले आहेत. या

### *तीन वेळा आला शेकडो कोटीचा निधी
### *कागदोपत्रीच योजनेचा केला विधी
### *आता जलजीवन मिशनच आधी

नळयोजना चालू करण्यासाठी सोलर पंपही बसविण्यात येणार आहे. आधिच्याच करोडो रूपयाचा घोटाळा करून सुरू न केलेल्या अर्धवट अवस्थेत असलेल्या ग्रामीण भागाच्या नळयोजना पुन्हा नव्याने सुरू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडून निधी देण्यात आला. मात्र भ्रष्टाचाराने पोखरून टाकलेल्या अधिकारी व ठेकेदारांना आता जुन्या भ्रष्टाचारावर नवीन भ्रष्टाचार करायला संधी मिळणार आहे. अगोदरच करोडो रूपये खर्च करूनही कधीही न सुरू झालेली नळयोजना कागदोपत्री सुरू दाखविली होती. किंवा खाजगी नळयोजना ग्रामपंचायतीला हाताशी धरून आपली नळयोजना सुरू असल्याचे दाखविले आहे. आता ह्याच जुन्या नळयोजना जलजीवन मिशनच्या नावाखाली थातुरमातूर सुरू करून पुन्हा अधिकारी व ठेकेदार महाघोटाळ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हक्काचे पाणी जनतेपर्यंत पोहोचल किंवा नाही याची श्वाश्वती देता येत नाही. त्यामुळे जुनी नळयोजना सुरू दाखवा आणि बक्षीस मिळवा किंवा जनतेनी आता पाण्यासाठी पेटून उठायची गरज आहे. काही अधिकाऱ्यांनी या संबंधि विचारणा केली असता बंद पाणी पुरवठा योजना जिल्हा परिषदेकडे वळत्या करण्याची विनंती केली होती. मात्र त्या जिल्हा परिषदेने स्वीकारली नाही. तर योजना जिल्हा परिषदेला द्यायची असेल तर माग अधिकाऱ्यांना पगार कशाचा द्यायचा असा प्रश्न पडतो. अधिकारी व ठेकेदार योजनेत भ्रष्टाचार करून हडप करण्यासाठीच असतात काय? असा प्रश्न सर्व सामान्य जनतेला पडला आहे. त्यामुळे ह्या योजना सुरू करण्यासाठी गाव पातळीवर पाणी द्या अन्यथा पाणी पेटवा आंदोलन उभारण्याची गरज आहे.

## थोडक्यात

### सवड येथील शासकीय निवासी शाळेत प्रवेशप्रक्रिया सुरु

**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील सवड येथील अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळेत शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ साठी प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येते.या निवासी शाळेत इयत्ता ६ वी ते १० वी (सेमी इंग्रजी माध्यम) पर्यंतच्या वर्गांसाठी प्रवेश अर्ज मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना मोफत निवास, ग्रंथालयीन सुविधा, सुसज्ज संगणक कक्ष तसेच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

प्रवेशासाठी जागांचे आरक्षण प्रवर्गनिहाय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, विजाभज ५ टक्के, विमाप्र २ टक्के आणि दिव्यांग ३ टक्के.इच्छुक विद्यार्थ्यांनी १५ मे २०२६ पर्यंत प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक अतुल भगत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक ९९२३७०३०५९ असा आहे.

### महाडीबीटीवर बियाणे अनुदानासाठी अर्ज मागविले

**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

सन २०२६-२७ अंतर्गत राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (तेलबिया–सोयाबीन) आणि कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत खरीप हंगामासाठी प्रमाणित बियाणे वितरण व पिक प्रात्यक्षिके या घटकांसाठी जिल्ह्याला लक्षांक प्राप्त झाले असून, शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी केले आहे.

सोयाबीन पिकासाठी मागील पाच वर्षांत प्रसारित वाणांचे बियाणे तसेच कडधान्य, अन्नधान्य, तृणधान्य व भरडधान्य पिकांचे बियाणे अनुदानावर उपलब्ध करून दिले जाणार आहे. पिक प्रात्यक्षिकांत सहभागी होण्यासाठी ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी किंवा कृषि क्षेत्रातील सहकारी संस्था महाडीबीटी प्रणालीद्वारे अर्ज करू शकतात. प्रत्येक गटात २५ शेतकरी व एकूण १० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक असून, प्रत्येक लाभार्थ्यास ०.४० हेक्टरपर्यंत लाभ मिळेल. गटात २५ पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्यांपैकी २५ जणांची निवड करावी; कमी असल्यास बाहेरील पात्र शेतकऱ्यांचा समावेश करता येईल. निवड प्रक्रियेत ३० टक्के महिला शेतकरी तसेच प्रवर्गनिहाय ७४.८० टक्के सर्वसाधारण, १६.६० टक्के अनुसूचित जाती आणि ८.६० टक्के अनुसूचित जमाती यांचा समावेश बंधनकारक आहे. निवड झालेल्या गटांनी विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या निविष्ठा व तंत्रज्ञानाचा वापर करणे, प्रात्यक्षिक प्लॉटसह तुलनात्मक प्लॉट ठेवणे आणि सर्व शेतकऱ्यांची मृद तपासणी करणे आवश्यक राहील.प्रमाणित बियाणे वितरणासाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असलेले वैयक्तिक शेतकरीही अर्ज करू शकतात. किमान ०.२० ते १.०० हेक्टर क्षेत्रासाठी आवश्यक बियाणे अनुदानावर दिले जाणार असून, 'पहिला अर्ज–पहिले प्राधान्य' या तत्वावर लाभ वितरित होईल. पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना मृद तपासणी अनिवार्य राहील. पिक प्रात्यक्षिक किंवा प्रमाणित बियाणे वितरण यांपैकी एका घटकाचाच लाभ घेता येणार आहे.अधिकाधिक शेतकरी गट, उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि वैयक्तिक शेतकऱ्यांनी महाडीबीटीच्या अधिकृत संकेतस्थळावरून अर्ज सादर करावेत, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# रिसोडच्या अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेत गैरप्रकार !

## रमीज खान आणि अलीम खान यांची राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाच्या अध्यक्षांकडे तक्रार

**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

रिसोड येथील कथित आणि गैरप्रकारात अव्वल असलेल्या, मुस्लीम समाजातील गरजू, होतकरू आणि पात्रताधारक उमेदवारांकडून लाखो रूपये डोनेशन घेवून अन्याय करणाऱ्या 'अल-हिलाल' अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक व समाज कल्याण संस्थेव्दारा संचालीत शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये फक्त संस्थाचालकांच्या रक्तसंबंधातील व्यक्तींना नियुक्त्या दिल्या जातात. या संस्थेद्वारा संचालीत सर्व शाळेतील बोगस नियुक्त्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी रिसोड येथील अन्यायग्रस्त बेरोजगार रमीज खान अकबर खान आणि मालेगाव पंचायत समितीचे माजी सदस्य अलीम खान उस्मान खान यांनी राज्याचे अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांचेकडे सोमवार ४ मे रोजी नागपूर येथे दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात तक्रारकर्ते रमीज खान आणि अलीम खान यांनी अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक मंडळ व समाज कल्याण संस्था, रिसोड चे कारभारी असलेले संस्था सचिव कबीर मोहसीन शेख अहेमद यांनी त्यांच्या संस्थेला धार्मिक (मुस्लीम) आणि भाषिक (उर्दू) दर्जाचे अल्पसंख्यांक प्रमाणपत्र शासनाकडून प्राप्त केले आहे. शिक्षण क्षेत्रातील काळ्याबाजाराचे ज्ञान प्राप्त असलेल्या कथित संस्थाचालकाने 'या' संस्थेद्वारा संचालीत शाळेमध्ये पदभरतीसाठी आवश्यक असलेली विद्यार्थी पटसंख्या उपलब्ध नसताना शालेय परिसराच्या बाहेरील, परगावातून विद्यार्थ्यांचे दाखले तस्करी करून विद्यार्थ्यांचा फुगवटा निर्माण केला आहे.बोगस पटसंख्या दाखवून बेकायदेशीररित्या स्वत:च्या मुला, मुलींसह रक्त संबंधातील अनेक नातलग व्यक्तीच्या नियुक्त्या केल्याचा आरोप केला आहे. तसेच रक्ताच्या नात्यातील लोकांना नोकरीवर लावण्याआधी त्या शाळेवर लाखो रूपयाचे डोनेशन देवून कायम नोकरी लागण्याच्या आशेवर असलेल्या मुस्लीम समाजातील अनेक गरजू, होतकरू, पात्र असलेल्या उमेदवारांना नोकरीवरून काढून टाकण्याचे पाप ही केल्याची बाब वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिली आहे.



या संस्थेद्वारा संचालीत सर्व शाळांमध्ये बाहेर गावातील विद्यार्थ्यांचे दाखले तस्करी करून पटसंख्या वाढवून पदभरती केल्याचा आरोपही या निवेदनात केला आहे. या शाळांची अचानकपणे पटपडताळणी केल्यास सर्व गैरप्रकार उघडकीस येतील असा दावा ही तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. कथित संस्थाचालकाने समाजसेवेच्या नावावर मुस्लीम समाजातील गरजू, होतकरु, पात्रताधारक उमेदवारांना शाळेवर नोकरी लावुन देण्याचे आमिष दाखवून अनेक अन्यायग्रस्त बेरोजगारांना लाखो रूपयांनी गंडविल्याचा आरोपसुद्धा तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत केला आहे.

कथित संस्थाचालकाने रिसोड शहरासह वाशीम शहरात आणि जवळच असलेल्या मराठवाड्यातील सेनगाव तालुक्यातही आपली दुकानदारी सुरू करून रक्ताच्या नात्यातील लोकांना नियुक्त्या देवून शासनाकडून दरवर्षी अल्पसंख्यांक संस्थांना पायाभूत सुविधेसाठी मिळणारा लाखो रूपयाचा निधी सुद्धा कागदोपत्री कामे दाखवून स्वा:हा केल्याचा आरोप ही तक्रारकर्त्यांनी केला आहे. वाशीम जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागातील भ्रष्ट


रिसोडच्या डॉ.अल्लमा इकबाल उर्दू शाळेतील गैरप्रकार चव्हाट्यावर!
नात्यातील व्यक्तींलाच नोकरी देण्याचा करार !
* रमीज खान आणि अलीम खान यांची एसआयटीकडे तक्रार
*रिसोडच्या अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेचा अफलातून फंडा
संस्था चालक पैशासाठी लाचार, अल-हिलाल कथित संस्थेत भ्रष्टाचार!
* सचिव आणि त्यांच्या मुलाकडे असलेल्या अपसंपदेची
सोमवार, दि. ४ मे २०२६
आज अमरावती येथे रिसोड व मालेगाव येथील वादग्रस्त शिक्षण संस्थेची एसआयटी समोर सुनावणी

अधिकारी, अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील भ्रष्ट अधिकारी कथित संस्थाचालकाचे पाठीराखे असल्यामुळे अल्पसंख्यांक आयोगाने अमरावती विभागाच्या बाहेरील प्रामाणिक वरिष्ठ अधिका—यामार्फत सखोल चौकशी करून सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करावी अशी मागणीही तक्रारकर्ते रमीज खान व अकील खान यांनी या निवेदनाद्वारे राज्याचे


पदभरतीची बंदी, संस्थाने साधली संधी !
* रक्ताच्या नात्यातील १० लोकांची नियुक्ती; अल-हिलाल च्या संस्थातेली प्रकार
* माध्यमिक शिक्षण विभागाच्या कृपादृष्टीने कथित सचिवाची भरभराट
* अन्यायग्रस्त रमीज खान व अलीम खान यांची एसआयटीकडे तक्रार

अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांना प्रत्यक्ष भेटून केली आहे.


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने...

# जिल्हा रुग्णालयात चल क्ष-किरण यंत्रणा कार्यान्वित !

**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, तत्पर आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने आरोग्य क्षेत्रात विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांनाही शहरांप्रमाणे आधुनिक व अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

याच धोरणाचा एक भाग म्हणून वाशिम जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक चल क्ष-किरण (इर्ंदूर्ते ं-ब) तपासणी यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या नव्या यंत्रणेमुळे जिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधांमध्ये लक्षणीय वाढ होणार असून रुग्णांना अधिक जलद, सुरक्षित व प्रभावी सेवा मिळणार आहे. राज्य शासनाच्या प्रयत्नांबरोबरच इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (घ्ध्ण) च्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाशिम हा आकांक्षी जिल्हा असल्यामुळे अशा सुविधा येथे उपलब्ध होणे हे जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेसाठी महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या माध्यमातून जिल्हा रुग्णालयाची सेवा क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. चल क्ष-किरण तपासणी यंत्रणेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे रुग्णांना तपासणीसाठी एक्स-रे विभागात नेण्याची आवश्यकता उरणार नाही. गंभीर, अपघातग्रस्त, अतिदक्षता विभागातील तसेच हालचाल करण्यास असमर्थ रुग्णांची तपासणी थेट त्यांच्या खाटेजवळ करता येणार आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन रुग्णांवर तात्काळ उपचार सुरू करणे शक्य होणार आहे. तसेच डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे काम अधिक सुलभ व गतिमान होणार आहे. विशेषतः ही यंत्रणा क्षयरोग निदानासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.



क्षयरोगाचे वेळेवर निदान व उपचार हे टीबी नियंत्रणासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने या यंत्रणेच्या माध्यमातून राज्याच्या टीबी मुक्त अभियानाला मोठी चालना मिळणार आहे. 'टीबी मुक्त वाशिम' हा संकल्प साकार करण्यासाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना लवकर निदान सुविधा उपलब्ध झाल्यामुळे क्षयरोग नियंत्रण मोहिमेला गती मिळण्यास मदत होईल. आपत्कालीन परिस्थितीमध्येही ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. अपघात, गंभीर दुखापत, शस्त्रक्रियेनंतरची तपासणी तसेच आयसीयूमधील रुग्णांसाठी ही सुविधा अधिक प्रभावी ठरणार असून रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी निर्णायक भूमिका बजावू शकते. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या रुग्णकेंद्रित व लोकाभिमुख धोरणांमुळे राज्यातील आरोग्य सेवा अधिक मजबूत होत असल्याचे दिसून येत आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून आरोग्य व्यवस्थेचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.या उपक्रमामुळे वाशिम जिल्हा रुग्णालयाच्या आरोग्य सेवेत गुणात्मक सुधारणा होणार असून जिल्ह्यातील नागरिकांना अधिक सक्षम, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा मिळण्यास मदत होणार आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा व बळ मिळत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे.

**लक्झरी बस स्टॅन्डसमोरील ...**

# घराला भीषण आग; लाखोंचे साहित्य जाळून खाक !


## पीडित कुटूंबाला न.प. नगराध्यक्ष आणि नगरसेवकांची भेट

**• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •**

वाशीम शहरातील लक्झरी बस स्टॅन्ड परिसरातील एका घराला अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली.आग इतकी भयानक होती की काही वेळातच घरातील साहित्य जळून खाक झाले असून घरावरील पत्राचे आणि लोखंडी अँगेलचे मोठे नुकसान झाले.घराला अचानक आग लागल्याचे पाहून परिसरात एकच खळबळ उडाली होती . वाशीम शहरातील लक्झरी बस स्टॅन्डसमोरील वर्षा सागर अंभोरे यांच्या घराला शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागल्याची घटना समोर आली. ही घटना ०४ मे रोजी दुपारच्या सुमारास घडली. आग लागल्याचे लक्षात येताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत वाशीम नगरपालिकेच्या अग्निशमन दलाला माहिती दिली.

काही वेळातच अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आणि शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात





आणली. मात्र तो पर्यंत या आगीत घरातील कपाट, देवघर, पलंग, टिव्ही, कुलर, घरगुती साहित्य तसेच इतर वस्तू जळून खाक झाल्या.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अंदाजे दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. घरातीलच विद्युत वाहिनीत झालेल्या शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान, वाशीम नगरपालिकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, नगरसेवक पुरणमल बदलाणी, आणि अमोल इंगोले यांनी पीडित कुटुंबाची भेट घेत आर्थिक मदत देण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

मंगळवार, दि. ५ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# स्वस्त धान्य दुकानदारांचे 3 महिन्याचे वाटप रखडल्याने लाभार्थींवर अन्याय

प्रतिनिधी ५ मे

**जळगाव जामोद :** केंद्र व राज्य शासनाने कार्डधारकांना एप्रिल मे व जून या तीन महिन्याचे धान्य एकाच वेळी वितरित करण्याचे आदेश पारित केले होते पण धान्य उपलब्ध होत नसल्याने बऱ्यापैकी वाटप रखडला आहे. त्यामध्ये जळगाव जामोद तालुक्यात अंत्योदय कार्ड संख्या ५५१२ वअन्नसुरक्षा कार्ड संख्या २८३४३ इतके लाभार्थी आहेत त्यामध्ये जळगाव जामोद तालुक्यात एकूण ९९ स्वस्त धान्य दुकाने असून त्यामधून ११ दुकाने हे शहरी आहेत काही लहान दुकानदारांना तीन महिन्याचे धान्य दिली असून मात्र बऱ्याच पैकी मोठे मोठे गावे यांना एकाच महिन्याचे धान्य पोझ झाले होते त्यामुळे त्यांनी एक महिन्याच्या धान्यामध्ये तीन महिन्याचे वाटप केल्याने बरेच लाभार्थी अजून पर्यंत धान्यापासून वंचित आहेत त्यामध्ये जळगाव जामोद हा

आदिवासी बहुल भाग असून या भागात सर्वत्र शेतकरी शेतमजूर व बरेपैकी आदिवासी बांधवांचे वास्तव्य आहे



त्यामध्ये या सर्वांची उपजीविका ही मिळणाऱ्या रेशनधान्यावर बऱ्यापैकी अवलंबून आहे त्यामुळे काही लाभार्थ्यांना तीन महिन्याचे धान्य मिळाले असून पण बऱ्याच लाभार्थ्यांना अजून पर्यंतधान्य पुरवठा न झाल्यामुळे तीन महिन्याचे धान्य मिळाले नाही यामध्ये बऱ्यापैकी जळगाव जामोद गोदामावर अपुरी वाहन उपलब्ध असल्यामुळे पण धान्याचा पुरवठा व्यवस्थित व वेळेवर होत नाही त्यामध्येच बाहेरून येणारा मक्का सुद्धा वेळेवर तालुक्यात पोहोचत नसल्याने सुद्धा वाटप बऱ्यापैकी रखडले आहे व तसेच एफसीआय कडून धान्य वेळेत उपलब्ध नझाल्यामुळे सुद्धा वितरण व्यवस्थेमध्ये अडथळे निर्माण झाले आहेत तीन महिन्याचे धान्य न मिळाल्याने तालुक्यात काही दुकानदारांनी एकाच महिन्याचे वाटप केले व काही दुकानदारांनी तीन महिन्याचे वाटप केले यात सुद्धा समभ्रम निर्माण झाला आहे यामध्ये उन्हाळ्याच्या त्रिवतेचा विचार करून नागरिकांना वारंवार रेशन दुकानावर जावे लागू नये विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील रहिवाशांना होणारा त्रास टाळण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला होता पण मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नसल्याने लाभार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजीची सूर पाहायला मिळत आहे यामध्ये तालुक्यातील बऱ्यापैकी द्वारपोच योजना वाहतूक वाहने नसल्याने कोलमंडांना दिसून येत आहे. यामुळे शासनाच्या उद्देशाला हरताळ फसताना दिसून येत आहे तसेच एफसीआय गोदाम मधून वाहतूक करणारी वाहने अपूर्ण असल्याने त्याचा फटका सुद्धा बसत आहे.

**स्वस्त धान्य दुकानदारांना तीन महिन्यांचे धान्य वाटप**

स्वस्त धान्य दुकानदारांना तीन महिन्यांचे धान्य वाटप एका महिन्यात करायचे होते परंतु ही प्रक्रिया खोळंबली त्यामुळे जळगाव जामोद तालुक्यात अंत्योदय कार्ड संख्या ५५१२ वअन्नसुरक्षा कार्ड संख्या २८३४३ इतके लाभार्थी आहेत त्यामध्ये जळगाव जामोद तालुक्यात एकूण ९९ स्वस्त धान्य दुकाने असून त्यामधून ११ दुकाने हे शहरी आहेत.

# बालिकेवर अत्याचार करून हत्या ; नराधमावर कठोर कारवाईची मागणी

## महाराष्ट्र ब्राम्हण सभेच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन



प्रतिनिधी ५ मे

**खामगाव :** पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील चिमुरडीवर अत्याचार करून खून करणाऱ्या नराधमास कडक शिक्षा करावी, अशा आशयाचे निवेदन स्थानिक महाराष्ट्र ब्राम्हण सभा व सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने ४ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना येथील उपविभागीय महसूल अधिकारी यांच्या मार्फत पाठविण्यात आले आहे.

निवेदनात नमूद आहे की, पुणे जिल्ह्यातील एका गावात चार वर्षीय बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. या घटनेचा महाराष्ट्र ब्राम्हण सभा व सकल ब्राम्हण समाज यांच्या वतीने तिव्र निषेध करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी ६५ वर्षीय संशयीतास अटक केली आहे. सदर प्रकरणी सखोल चौकशी करून नराधमावर कठोर कारवाई करण्यात यावी व पिडीतेच्या कुटुंबियांना कायद्याचे सरंक्षण मिळावे, अशी मागणी निवेदनात केली आहे. निवेदनावर महाराष्ट्र ब्राम्हण सभा अध्यक्ष ॲड. शेखर जोशी, सचिव ॲड. उदय आपटे, अमोल जोशी, जितेंद्र पुरोहीत, प्रल्हाद शर्मा, अनिता देशपांडे, स्वप्निल महर्षी, प्रशांत कुळकर्णी, नरेंद्र काळे, दत्तात्रय कंझारकर, दिपक पेठे, प्रा. रामकृष्ण भिते, महेश दंडे, शंभु शर्मा, मयुर शर्मा, वैभव शास्त्री आदींच्या सह्या आहेत.

# ब्राह्मण सभेतर्फे सामूहिक व्रतबंध सोहळा उत्साहात

**मलकापूर :** ब्राह्मण सभेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही सामूहिक व्रतबंध (उपनयन) सोहळा धार्मिक वातावरणात आणि उत्साहात पार पडला. सामाजिक बांधिलकी जपत अनेक वर्षापासून राबविण्यात

येणाऱ्या या उपक्रमाला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सोहळ्यात एकूण १० बटूंनी सहभाग घेतला.मलकापूर, जामनेर, मोताळा, पहूर, ब-हाणपूर, भुसावळ व नांदुरा आदी ठिकाणांहून आलेल्या बटूंनी व्रतबंध संस्कारात सहभागी होत आपले धार्मिक कर्तव्य पार पाडले. संपूर्ण कार्यक्रम शास्त्रोक्त पद्धतीने पार पडला. व्रतबंध संस्कारासह सर्व धार्मिक विधी पारंपरिक रीतीरिवाजांचे पालन करत विधिवत करण्यात आले.

या सोहळ्याचे पौरोहित्य अमर जोशी यांच्यासह इतर ब्रह्मवृंदांनी केले. यशस्वी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ब्राह्मण सभा कार्यकारिणी, महिला कार्यकारिणी तसेच युवा कार्यकारिणीने विशेष परिश्रम घेतले. यावेळी आमदार चैनसुख संचेती यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# समृद्धीवर दरोडेखोरांची सशस्त्र लूट ; बीडमधून 8 आरोपी जेरबंद

## 12.48 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ५ मे

**बुलढाणा :** समृद्धी महामार्गावर व्यापाऱ्याला लक्ष्य करत पिस्तुलाच्या धाकावर करण्यात आलेल्या सशस्त्र लुटीचा बुलढाणा पोलिसांनी अवघ्या २४ तासात पर्दाफाश केला. या प्रकरणात आंतरराज्य दरोडेखोर टोळीतील ८ आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून १२ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी एक जम्मू-काश्मिरमधील आहे. बीड पोलिसांच्या सहकार्याने ही कारवाई करण्यात आली.

गुजरातमधील व्यापारी अभयसिंह आनंदसिंह वाघेला (वय ३२, रा. बनासकाठा) हे २ मे रोजी नागपूरहून उंझा (गुजरात) येथे १२ लाख रुपयांची रोकड घेऊन वाहनाने (क्र. एमएच ०१ ईज ३७६८) जात होते. दुसरबीड टोल नाक्याजवळ टायरमधील हवा तपासत असताना, दोन वाहनातून आलेल्या १० ते १२ जणांनी त्यांना घेरले. मारहाण करून पिस्तुलाचा धाक दाखवत वाहनासह रोकड लुटली आणि वाघेला यांना जालना जिल्ह्यातील जंगलात सोडून पलायन केले. या घटनेप्रकरणी किनगाव राजा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.कारवाईत १२ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात १.८० लाखांची रोखरक्कम, एक देशी पिस्तूल, चार जिवंत काडतुसे आणि पाच लाखांची दोन वाहने व चार मोबाइल, दोन वाय-फाय डिव्हाइसचा समावेश आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांच्या आदेशानुसार, अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा व अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिसांनी आरोपींना बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई परिसरात शस्त्रांसह पकडले. आरोपींमध्ये हिम्मतसिंग कुंदनसिंग जुनी (बीड), मुन्ना केशवकुमार वर्मा (उ.प्र.), मनोज सर्जेराव कुटे (बीड), मो. रशीद नूरदिन गुज्जर (जम्मू-काश्मीर), सचिन शिर्के (रायगड), हरीश तोमर देवळीकर (कर्नाटक), अरुणकुमार रामनरेश यादव (उ.प्र.), जसपालसिंग केसरसिंग झाला (गुजरात) यांचा समावेश आहे.

# अनुदानावर बियाणे मिळणार, महाडीबीटी वर अर्ज केला का ?

प्रतिनिधी ५ मे

**खामगाव :** खरीप हंगाम २०२६साठी राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची बी-बियाणे अनुदान योजना जाहीर केली असून, या योजनेंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.हवामान बदल, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीतील जोखमी लक्षात घेता शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. विशेष म्हणजे, काही निवडक घटकांमध्ये व ठरावीक अटींच्या आधारे शेतकऱ्यांना १०० टक्क्यांपर्यंत अनुदानाचा लाभमिळण्याची शक्यता आहे.

त्यामुळे अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. बियाण्याच्या दर्जावर भर देत उत्पादन क्षमता वाढवणे आणि शेती अधिक फायदेशीर करणे, हा या योजनेमागील उद्देश असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**राज्य सरकारची बियाणे अनुदान योजना काय आहे?**

राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना दर्जेदार व प्रमाणित बियाणे उपलब्ध व्हावे, यासाठी बी-बियाणे अनुदान योजना राबवली जाते. या योजनेत शेतकऱ्यांना खरेदी केलेल्या बियाण्याच्या किमतीवर आर्थिक सहाय्य दिले जाते. उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होईल.

**शेतकऱ्यांना कोणत्या पिकांसाठी किती अनुदान?**

सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि भुईमूग या प्रमुख खरीप पिकांसाठी अनुदान लागू आहे. बियाण्यांच्या प्रकारानुसार व वर्गवारीनुसार अनुदानाचा दर ठरतो. काही योजनांतर्गत ठराविक घटकांवर ५० ते १०० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते.

**जिल्ह्यातील कोणते शेतकरी अनुदानास पात्र ?**

नोंदणीकृत शेतकरी, ज्यांच्याकडे वैध ७/१२ उतारा आणि आधार क्रमांक आहे, तसेच ज्यांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी केली आहे, ते या योजनेसाठी पात्र ठरतात.

# तीन राज्यांतील विजयाचा खामगावात भाजपकडून जल्लोष

## फटाक्यांची आतषबाजी करत मिठाई वाटप

प्रतिनिधी ५ मे

**खामगाव :** देशातील तीन राज्यांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या विजयाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी खामगाव शहरात भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. शहरातील प्रमुख चौकात मोठ्या संख्येने कार्यकर्ते एकत्र येत विजयाचा आनंद व्यक्त केला.

यावेळी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी कार्यकर्त्यांसोबत नृत्य करत उत्सवात सहभाग नोंदवला.भाजपचा विजय असो' अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता.



कार्यकर्त्यांकडून नागरिकांना मोतीचूर लाडू व फराळाचे वाटप करण्यात आले. तसेच फटाक्यांची आतषबाजी करत विजयाचा आनंद साजरा करण्यात आला अनेकांनी एकमेकांना मिठाई भरवत आनंद व्यक्त केला या जल्लोषामुळे काही काळ परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

# 'आपले सरकार' केंद्रात लूट थांबणार; तक्रारीसाठी आता 'क्यूआर' अनिवार्य!

**खामगाव :** नागरिकांना विविध शासकीय प्रमाणपत्रे व सेवा मिळवताना पारदर्शकता यावी आणि अवाजवी शुल्क आकारणीला आळा बसावा, यासाठी आपले सरकार सेवा केंद्रात सुधारित दरफलक व तक्रार नोंदविण्यासाठी क्यूआर कोड केंद्राच्या दर्शनी भागावर लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयामुळे सेवा केंद्रांच्या कामकाजावर अधिक नियंत्रण येणार असून नागरिकांना सुलभ, पारदर्शक सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

नवीन नियमांनुसार, प्रत्येक सेवा केंद्रावर सेवा शुल्काचा तपशील, अधिसूचित सेवांची यादी, अभिप्राय देण्यासाठी तसेच थेट ऑनलाइन तक्रार नोंदविण्यासाठी क्यूआर कोड उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व 'आपले सरकार' केंद्रांचे ठिकाण दर्शविणारा क्यूआर कोडही लावण्यात येणार आहे. जिल्ह्यात सध्या सुमारे एक हजार 'आपले सरकार सेवा केंद्रे' कार्यरत असून, या केंद्रांमार्फत विविध प्रमाणपत्रे, दाखले आणि शासकीय सेवा नागरिकांना दिल्या जातात; मात्र काही ठिकाणी अवाजवी शुल्क आकारणीच्या तक्रारी वाढत असल्याचे निदर्शनास आले होते.

**सेवा केंद्रांतील अवाजवी शुल्काला आळा**

**अभिप्राय, सूचना अन् थेट ऑनलाइन तक्रार**

नागरिकांना आता थेट क्यूआर कोड स्कॅन करून अभिप्राय देणे, सूचना नोंदविणे तसेच ऑनलाइन तक्रार करणे शक्य होणार आहे.

**क्यूआर कोडमुळे सहज उपलब्ध होणार माहिती**

प्रत्येक केंद्राच्या दर्शनी भागावर विविध प्रकारचे क्यूआर कोड लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांना मोबाइलद्वारे आवश्यक माहिती व सेवा सहज उपलब्ध होणार आहेत.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा नियमानुकूल करण्यासाठी डफडे बजाव आंदोलन



**खामगाव :** मातंग समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने सोमवारी, ४ मे रोजी नगरपरिषदेसमोर डफडे बजाव आंदोलन करण्यात आले. मागण्या तत्काळ मार्गी लावाव्यात, या मागणीसाठी हे आंदोलन छेडण्यात आले होते.

स्थानिक रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यात आला असून, पुतळा नियमानुकूल करून सुशोभीकरण करावे, तसेच इतर मागण्यांसाठी समितीच्या वतीने मागील ४१ दिवसांपासून नगर परिषदेसमोर साखळी उपोषण सुरू आहे; मात्र नगराध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांनी अद्याप उपोषणस्थळी भेट दिलेली नसल्याने समाज बांधवांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी डफडे वाजवत निषेध व्यक्त केला. यानंतरही प्रशासनाने मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

# बायो–बेस्ड सेल्फ–हीलिंग आणि नाईट व्हिजिबिलिटी रोड टेक्नॉलॉजी

प्रतिनिधी ५ मे

**शेगाव :** संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बायो बेस्ड सेल्फ हीलिंग आणि नाईट व्हिजिबिलिटी रोड टेक्नोलॉजी ठाकूर राजवर्धन व अथर्व देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धित केली.

सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी बायो-बेस्ड सेल्फ-हीलिंग आणि नाईट व्हिजिबिलिटी वैशिष्ट्ये असलेली एक अभिनव रोड टेक्नॉलॉजी वर्धित केली आहे. पावसाळ्यात रस्त्यांवरील खड्डे आणि क्रॅक्स ही मोठी समस्या असून या तंत्रज्ञानामुळे ती कमी करण्यास मदत होऊ शकते. या प्रणालीमध्ये क्रॅक्स कमी करण्यासाठी बायो-बेस्ड सेल्फ-हीलिंग यंत्रणा वापरली जाते तसेच रात्रीच्या वेळी रस्त्याची दृश्यता वाढवण्यासाठी ग्लो-बेस्ड कोटिंगचा वापर केला आहे.

या विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा छोट्या प्रमाणात प्रोटोटाइप तयार करून श्री गजानन महाराज मंदिर परिसर, रेल्वे स्टेशन परिसर या तंत्रज्ञानाचा रंग (कोटिंग) लागू केला आहे.



**विद्यार्थ्यांची अभिनव कामगिरी ! स्वत :च्या खर्चाने अंमलबजावणी केली रोड टेक्नॉलॉजी**

या संपूर्ण प्रकल्पाचा खर्च विद्यार्थ्यांनी स्वतः उचलला असून ही स्थानिक विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे. सध्या हे विद्यार्थी सेल्फ-हीलिंग सिमेंटवर पुढील संशोधन करत आहेत. ही टेक्नॉलॉजी कमी खर्चात तयार करण्यात आली असून भविष्यात मोठ्या प्रमाणात वापरासाठी अभ्यास सुरू आहे. या नवकल्पनेमुळे स्थानिक भागात अपघात कमी होण्यास मदत होऊ शकते आणि रस्ता सुरक्षेत वाढ होऊ शकते.

ही तंत्रज्ञान सध्या प्रायोगिक टप्प्यात असून त्यावर पुढील संशोधन सुरू आहे. प्रारंभिक स्तरावर सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. या तंत्रज्ञानासाठी पेटंट अर्ज दाखल करण्यात आला असून तो सध्या प्रक्रियेत आहे. प्रशासनाने या तंत्रज्ञानाचा विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आयुष्यात संस्कार, शिस्त पाळल्यास जीवनाला आकार : जनार्दन हरीजी महाराज

**मलकापूर :** देहाचे चैतन्य म्हणजे आत्मा आणि तोच राम आहे. त्यामुळे श्रीरामांचे पूजन केले पाहिजे. आयुष्यातील मर्यादा, संस्कार व शिस्त पाळल्यास जीवनाला योग्य आकार प्राप्त होतो, असे प्रतिपादन महामंडलेश्वर स्वामी जनार्दन हरीजी महाराज यांनी केले.

तालुक्यातील हरसोडा येथील श्रीमती व्ही. एस. रायपुरे विद्यालयात २ ते ९ मेदरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, श्रीरामकथा व कीर्तन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा प्रारंभ शनिवारी दुपारी श्रीरामकथेने झाला. या वेळी स्वामी जनार्दन हरीजी महाराज प्रबोधन करत होते. प्रास्ताविक महंत नितीनदास महाराज, तर आभारप्रदर्शन श्रीराम कथा समितीचे अध्यक्ष संतोष रायपुरे यांनी केले.

तालुक्यात ४३ अंश सेल्सिअस तापमान असतानाही दुपारी २.३० वाजता श्रीरामकथेसाठी आबालवृद्धांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावरून भक्तांची श्रद्धा व प्रभू श्रीरामांविषयीचे प्रेम अधोरेखित झाले. सकाळच्या सत्रात आळंदी येथील ह.भ.प. विजय महाराज खवले यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. पांडुरंगाच्या नामगजरात समाजप्रबोधनपर विचार मांडण्यात आले.

# नागझरीत प्रौढाची गळफास घेऊन आत्महत्या

**शेगाव :** तालुक्यातील नागझरी येथे ४२ वर्षीय प्रौढाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ४ मे रोजी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी शेगाव शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयताचे नाव रामेश्वर रामकृष्ण सोळंके (४२, रा. नागझरी, ता. शेगाव) असे आहे. रवींद्र सुधाकर हिंगणे (रा. वक्रतुंड कॉलनी, शेगाव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, रामेश्वर सोळंके यांनी घरात गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच शेगाव शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. ५ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेकडे पालकांनी फिरवली पाठ


## प्रवेश प्रक्रियेला दुसऱ्यांदा मुदतवाढ, आतापर्यंत 1517 प्रवेश निश्चित

प्रतिनिधी ५ मे

**अकोला :** आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत (सन २०२६-२७) सोडतद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या कागदपत्र पडताळणी व प्रवेश निश्चिती प्रक्रियेस पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पालकांना ८ मेपर्यंत अंतिम संधी देण्यात आली आहे. विविध कारणांमुळे अनेक पालकांना निर्धारित कालावधीत आवश्यक कागदपत्रे सादर करता न आल्याने शिक्षण विभागाने ही मुदतवाढ जाहीर केली आहे. त्यामुळे अद्याप प्रक्रिया पूर्ण न केलेल्या पालकांसाठी ही शेवटची संधी मानली जात आहे. दरम्यान पालकांना हव्या असलेल्या शाळांचा कोटा पूर्ण झाल्याने पालकांनी इतर शाळांची निवड करणे टाळल्याने आरटीईतून प्रवेशासाठी पालक निरूत्साहित असल्याचे दिसून येत आहे.

### ही कागदपत्रे आवश्यक

शिक्षण विभागाने पुन्हा एकदा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. ८ मेपर्यंत कागदपत्र पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कालावधीत संबंधित पालकांनी आपल्या मुलांच्या प्रवेशासाठी आवश्यक सर्व कागदपत्रे जसे की जन्मदाखला, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी पुरावा, जातीचा दाखला (लागू असल्यास) इत्यादी सादर करणे आवश्यक आहे.




आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागांवर मोफत शिक्षणाची संधी दिली जाते. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी १७ फेब्रुवारीपासून सुरू झाली होती. सुरुवातीची अंतिम मुदत ३१ मार्च होती; मात्र मोठ्या प्रतिसादामुळे ती तीन वेळा वाढवण्यात आली. अकोला जिल्ह्यातील १८५ शाळांमध्ये एकूण २०५६जागा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. अर्ज प्रक्रियेनंतर राज्यस्तरावर पारदर्शक पद्धतीने २०५६ जागांसाठी ऑनलाईन सोडत काढण्यात आली. त्यानंतर पहिली निवड यादी व प्रतीक्षा यादी जाहीर करण्यात आली असून निवड झालेल्या पालकांना मोबाईल संदेश व संकेतस्थळाद्वारे माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, आतापर्यंत १५१० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. उर्वरित जागांसाठी अद्यापही मोठ्या संख्येने पालकांनी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने मुदतवाढ देत पालकांना कागदपत्रे सादर करून प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन केले आहे.

# सोन्याची अंगठी हिसकावून फरार झालेल्या चोराच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या

प्रतिनिधी ५ मे



**अकोला:** शहरातील पोलीस लॉन समोर लघु शंका करण्याकरता थांबलेल्या एका वृद्ध व्यक्तीच्या हातातील सोन्याची अंगठी एका दुचाकी वर आलेल्या अज्ञात चोरट्याने हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेच्या काही तासातच सिटी कोतवाली पोलिसांनी या अज्ञात चोरट्याला अटक करून १,१०,००० रु चा मुद्दे ?माल हस्तगत करीत जबरी चोरीचा गुन्हा उघडीकीस आणला. ही घटना सोमवार ४ मार्च रोजी घडली.

फिर्यादी रमेश धोंडुजी केळकर, वय ७२ वर्षे रा. गणेशनगर, रिंगरोड, यांच्यासोबत ही लुटमारीची घटना दिवसाढवळा घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती.

फिर्यादी यांनी आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. पोलिसांनी तांत्रीक तपासावरून व गुप्तबातमीदाराच्या माहिती वरून सदर गुन्हयातील आरोपी नामे प्रणव मोहन बिचकुंदे, वय १८ वर्षे रा. साधना चौक, तेलंगीपुरा, अकोट फाईल, अकोला यास अटक करीत आरोपीकडुन गुन्हयात चोरी गेलेली सोन्याची अंगठी व गुन्हयात वापरलेली सुझुकी ?सेस कंपनीची मोटार सायकल असा एकुण १,१०,००० रु चा मुद्दे ?माल हस्तगत केला.

ही कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. बी. चंद्रकांत रेडड़ी साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला श्री. सुदर्शन पाटील साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन सिटी कोतवाली यांनी केली

# समर्थ गॅस एजन्सीचे ग्राहक वाऱ्यावर कोणत्या एजन्सीला जोडले याचा थांगपत्ता नाही

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** डाबकी रोडवरील समर्थ गॅस एजन्सीच्या खातेदारांना कोणत्या एजन्सीला जोडले याचा उलगडा होत नाही. त्यामुळे उन्हातान्हात संबंधितांना भटकंती करावी लागत आहे.

गंभीर बाब म्हणजे ज्यांनी आधी नंबर लावला होता. तसेच पैसे भरले होते त्यांना पुन्हा नंबर नव्याने लावा असे सांगितले जात आहे. पुरवठा विभागाने याकडे लक्ष देऊन तिढा सोडवावा अशी मागणी केली जात आहे.

समर्थ गॅस एजंसीचा परवाना रद्द झाला. त्यामुळे ग्राहकांना अन्य चार एजन्सीला जोडण्यात आले.




परंतु काही ग्राहकांना कळायला मार्ग नाही की नेमक्या कोणत्या एजन्सीला आपण जोडले गेलो. त्यांना उन्हातान्हात भटकंती करावी लागते आहे. तसेच आधी जो नंबर लावला त्याचा थांगपत्ता नाही. विशेष म्हणजे पुरवठा विभागाकडून योग्य उत्तर दिले जात नाही. याकडे तातडीने लक्ष द्या अशी मागणी केली जात आहे.

# अकोल्यात विषाणू निदान प्रयोगशाळेला मंजुरी

प्रतिनिधी ५ मे

**अकोला :** अकोला तसेच राज्यातील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती. केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथे विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली आहे.

राज्यात आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून विषाणू निदान प्रयोगशाळांचे जाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला आहे. या संदर्भात १३ जुलै २०१७ रोजी तत्कालीन केंद्रीय आरोग्यमंत्र्यांना पत्र लिहून केंद्र शासनाच्या आरोग्य संशोधन विभागामार्फत देशभर उभारण्यात येणाऱ्या १५० अत्याधुनिक विषाणू प्रयोगशाळांच्या उपक्रमाचे स्वागत करत महाराष्ट्राला योग्य वाटा देण्याची मागणी करण्यात आली होती. या पत्रात देशाच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नागपूर आणि राज्याची राजधानी मुंबई येथे राज्यस्तरीय प्रयोगशाळा



पश्चिम विदर्भात पहिली प्रयोगशाळा संसर्ग रोग नियंत्रणासाठी विषाणू निदान प्रयोग शाळा या योजनेसाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात आला. या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य होणार आहे. या मंजुरीमुळे आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे.तसेच राज्यातील विविध विभागांतील दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली होती.केंद्र शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे राज्यस्तरीय विषाणू प्रयोगशाळा मंजूर केली. याशिवाय इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच अकोला, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे आणि मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा उभारण्यास मान्यता देण्यात आली. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून एकूण २९ कोटी २१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

कोविड-१९ महामारीच्या काळात या प्रयोगशाळांनी आरटी-पीसीआर चाचण्यांद्वारे मोठी भूमिका बजावली. याशिवाय, या प्रयोगशाळांमुळे विविध विषाणूजन्य आजारांचे निदान करणे शक्य झाले आहे. आतापर्यंत कोविड-१९ (३७,२१,१५४), डेंग्यू (८८,३२७), चिकनगुनिया (३९,८१७), झीका (३,९२३), स्क्रब टायफस (७,०९१), इन्फ्लुएंझा (२७,५३६), एचबीव्ही(१,५३,१८०), रोटाव्हायरस(६५१)अशा एकूण ४०,४१,६८९ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळाली असून भविष्यात उद्भवणाऱ्या संसर्गजन्य आजारांशी लढण्यासाठी राज्य अधिक सक्षम झाले आहे.

# शहरातील मालमत्ताधारकांनी मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करून सूटचा लाभ घ्यावा

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांनी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे मागणी देयके (कराचे बिल) तयार करण्यात येत आहे. ज्या मालमत्ता धारकांना मागणीचे देयक मिळाले नाही त्यांनी पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोन कार्यालयामधुन देयक प्राप्त करुन घ्यावे. मालमत्ता कराचा ऑनलाईन भरणा करण्याकरिता akolamc.in हे संकेत स्थळ कार्यान्वीत करण्यात आले आहे. तसेच सर्व कर वसुली लिपीकांकडे घरोघरी जावुन रोख व ऑनलाईन भरणा करण्याकरीता टॅब व प्रींटर देण्यात आले आहे. तसेच मालमत्ता धारकांना आपला कराचा भरणा रोख ने, फोन पे, गुगल पे, डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड व्दारे सुध्दा करता येईल.

अकोला महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना सूचित करण्यात येते की, चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कराचे आगाऊ भरणा (Advance Payment) १५ जून २०२६ च्या आत केल्यास सामान्य कराच्या रक्कमेत ७% सूट देण्यात येईल १५ जुलै २०२६ च्या आत केल्यास ६ % व १५ ऑगस्ट २०२६ पर्यत भरल्यास ५% सामन्य करात सूट (Discount) देण्यात येत आहे.

तरी सर्व मालमत्ता धारकांनी थकीत व चालु मालमत्ता कराचा भरणा करुन चालु वर्षाच्या सामान्य कराच्या रक्कमेच्या सुटचा लाभ घेण्याचे आवाहन मनपा उपायुक्त विजय पारतवार यांनी केला आहे.

वीर शैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमी जागेवर

# अतिक्रमण महापालिकेने जेसीबी द्वारे काढले...!

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** जुन्या मोहता मिल परिसरात वीर सिंग लिंगायत समाजाच्या स्मशानभूमी साठी राखीव जागेवर पक्के बांधकाम करण्यात आले होते. या विरुद्ध आवाज उठवल्यामुळे अतिक्रमण जेसीबी द्वारे काढण्यात आले. आता या ठिकाणी कुंपण घालून ही जागा ताब्यात घेण्यात येणार आहे.

स्मशानभूमी साठी राखीव जागा देखील हडप करण्याचा प्रयत्न केला जातो ही अतिशय संतापजनक बाब आहे. वीर सिंग लिंगायत समाजाच्या बांधवांनी या



विषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. शेवटी महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने बांधकाम तोडले. तसेच ज्या कारणासाठी जागा राखीव आहे त्यासाठी योग्य वापर व्हावा म्हणून येथे कुंपण घातले जाणार आहे. कारवाई सुरू असताना समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाकडून नरसापूर येथील नराधमाला कडक शासन करण्याची मागणी

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** नरसापूर येथील चिमुकली ज्या नराधमाच्या अत्याचाराला बळी पडली त्या नराधमास मृत्युदंडाची शिक्षा त्वरीत झाली पाहिजे अशी मागणी अखिल भारतीय ब्राम्हण महासंघ अकोला जिल्हाने केली. फास्ट ट्रॅक कोर्टाच्या माध्यमातून लवकरात लवकर निर्णय करून आरोपीला कठोर शिक्षा झाल्यास समाजामध्ये असे कृत्य करणाऱ्या विकृती ठेचल्या जातील व परत महाराष्ट्रात माता भगिनींवर अशा प्रकारचे अत्याचार होऊ नये याकरिता प्रशासनाने काळजी घ्यावी, अशी



मागणी निवेदनात केली.

मागणीचे निवेदन एका शिष्टमंडळाने मंगळवारी दुपारी जिल्हाधिकारी यांना सादर केले. ब्राह्मण महासंघाचे जिल्हाध्यक्ष श्याम कुळकर्णी, उदय महा, सुधीर देशपांडे, राजेंद्र टाकळकर, मंजुषा घोटीकर, अंजली जोशी, पल्लवी कुळकर्णी, चंद्रशेखर जोशी, विजय तिवारी, राधेश्याम शर्मा, गजानन तिवारी, सौरभ भगत, अतुल पाटील, संजय शर्मा, अरुण दुधाळकर, डॉ. अरविंद देशपांडे, विष्णुप्रसाद तिवारी, सुबोध देशपांडे, मृणाल कुळकर्णी, माधुरी देशपांडे, अर्चना बोबडे, आशीष मालशे, विनोद जकाते, लक्ष्या शर्मा, अक्षय गंगाखेडकर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांनी चिमुकलीला श्रध्दांजली वाहिली.

# गुरुवार सात तारखेपासून तुमची सावलीही सोडणार साथ

## नागरिक घेतील शून्य सावलीचा अनुभव

प्रतिनिधी ५ मे

**अकोला:** असे म्हणतात की माणसाची सावली कधीही त्याची साथ सोडत नाही.परंतु निसर्गाचा चमत्कार असा की कधीही साथ न सोडणाऱ्या सावलीला सुद्धा मनुष्याची साथ सोडणे भाग पडते. निसर्गाच्या चमत्कारांची मालिका अखंड सुरू असते. मात्र त्यातील काही घटना मानवी कुतूहल वाढवून ठेवतात. असाच एक रोमांचकारी अनुभव येणाऱ्या ७ मे ते २१ में या कालावधीत संपूर्ण राज्यात ठीक ठिकाणी घेता येणार आहे या दिवसात भर दुपारी ठीक बारा वाजता तुमची सावली गायब होणार असून या अनोख्या खगोलीय घटनेला शून्य सावली दिवस म्हणून ओळखले जाते कर्कवृत्त आणि मकरवृत्त या दोन काल्पनिक रेषांच्या दरम्यान असलेल्या प्रदेशातच वर्षातून दोन वेळा असा अनुभव घेता येतो. सूर्याची किरणे या पट्ट्यात लंबवत पडत असल्याने सरळ उभे असलेल्या कोणत्याही वस्तूची सावली यावेळी दिसत नाही. सावलीचा शून्य अनुभव घेण्यासाठी कोणत्याही सपाट पृष्ठभागावर एखादा दंडगोल पेन्सिल किंवा बाटली अगदी सरळ उभी ठेवावी दुपारी बाराच्या सुमारास तिची सावली हळूहळू कमी होत पूर्णपणे नाहीशी झालेली दिसेल या खगोलीय घटनेचा अनुभव घेण्याचे आवाहन मराठी विज्ञान परिषदेने केले आहे प्रत्येक शहरासाठी वेळेत काही सेकंदाचा फरक असला तरी साधारणतः दुपारी १२ ते १२:३५ यावेळी निरीक्षण करता येईल.



### पृथ्वीच्या कललेल्या अक्षांमुळे अनुभव

पृथ्वीच्या कललेल्या अक्षांमुळेच आपल्याला ऋतुचक्र आणि शून्य सावली वैविध्यपूर्ण घटनांचा अनुभव घेता येत असल्याची माहिती मराठी विज्ञान परिषदेतर्फे दिली असून या शून्य सावलीचा अनुभव घेण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

# पैशाच्या वादातून गायगावला हाणामारी

**अकोला :** पैशाच्या वादातून मारहाण व चार चाकी वाहन पेटवल्याची घटना रविवारी गायगाव येथे घडली. याप्रकरणी गायगाव येथील सात आरोपीं विरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी विशाल सुरेश खारोडे रा. शिवसेना वसाहत अकोला यांचे व्याळा येथील मित्र अजय सोळंके यांचे गायगाव येथील शेख इमरान यांच्याकडे पैसे होते. पैसे मागण्यासाठी गायगाव येथे इमरान शेख इमरान यांच्याकडे गेले असता, पैसे देत नाही जे करायचे ते करा, असे म्हणत वाद घातला तसेच वस्तऱ्याने वार करून जखमी केले व अजय सोळुंके यांना लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.

# अंगारकी चतुर्थीला आस्था आणि भक्तीचा संगम

प्रतिनिधी ५ मे

**अकोला :** शहरात आज आस्था आणि भक्तीचा संगम अनुभवायला मिळाला. अंगारकी संकष्टी चतुर्थीचा पवित्र पर्व मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. जठारपेठ, डाबकी रोड, जवाहर नगर, मोरेश्वर कॉलनी, जयहिंद चौक आदी परिसरातील गणपती मंदिरांसह कौलखेड व शिवनगर येथील समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराज मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी भाविकांनी भगवान श्री गणेशाची विधिवत पूजा-अर्चना करून व्रताचे पालन केले.



शहराच्या मध्यभागी देवरा बाबा चाळ येथे असलेल्या प्राचीन स्वयंभू मंदार गणेश मंदिरात सकाळी ९ वाजता वेद मंत्रांच्या उच्चारात अथर्वशीर्ष पठण व दुग्धाभिषेक करण्यात आला. सकाळी ११ वाजता महिला भक्तांच्या उपस्थितीत 'ॐ गं गणपतये नमः' मंत्रजप करत हजारो दुर्वा अर्पण करण्यात आल्या. दुपारी ४ वाजता महिला भजन मंडळाने सुमधुर भजन सादर करून संपूर्ण परिसर भक्तिमय केला. तसेच अकोला शहरापासून सुमारे १७ किलोमीटर अंतरावर असलेल्या गायगाव येथील मंदिरातही विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम पार पडले. अनेक भाविकांनी पहाटेच पायी पदयात्रा करत दर्शनाचा लाभ घेतला. ज्योतिषशास्त्रानुसार संकष्टी चतुर्थी मंगळवारी आल्यास तिला 'अंगारकी चतुर्थी' असे म्हटले जाते. हा योग अत्यंत दुर्मिळ व फलदायी मानला जातो.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK